

रंगछटा
अनेक...

कलाकृती
एकच

कॅलिडोस्कोप सेवेचा



आपल्या
कॅलिडोस्कोपची
प्रत्येक फेरी
एका
नवीन कथेचा
उलगडा करेल...

सेवाभाव
समर्पण
करुणा
प्रतिबद्धता
निस्वार्थता
चिकाटी
सहानुभूती
योगदान
प्रेरणा
नेतृत्व
सेवा
धैर्य
प्रभाव
हितचिंतक
माणुसकी
उदारता
समर्पण
सक्षमीकरण
परिवर्तन
चिकाटी

आमचे स्वयंसेवक,
आमचे प्राप्तकर्ते,
आमचे लाभार्थी
आणि सेवा सहयोगच्या
१७ वर्षांच्या प्रवासातील
मैलाच्या दगडांच्या गोष्टी.

SEVA SAHAYOG
Celebrating Humanity

संचालक मनोगत: या हृदयीचे...

३१ ऑगस्ट २०२६ रोजी सेवा सहयोग फाउंडेशन आपल्या सेवेची १७ वर्षे पूर्ण करत आहे. मागे वळून पाहताना आमचे हृदय अथांग कृतज्ञतेने भरून येते. हा मार्ग सेवेच्या सामायिक भावनेने एकत्र आलेल्या असंख्य व्यक्ती आणि कॉर्पोरेट्सच्या विश्वासाने, सद्भावनेने आणि निस्वार्थ योगदानाने सुकर झाला आहे. इतर कोणत्याही संस्थेप्रमाणेच,सेवा सहयोगने देखील काळानुरूप आपले कार्य आणि क्षमता या दोन्हीमध्ये प्रगती केली आहे. आमची सुरुवातीची वर्षे एक भक्कम पाया रचण्यात आणि आपला सामूहिक मार्ग शोधण्यात व्यतीत झाली असली, तरी १८ व्या वर्षात पाऊल ठेवताना आपला आत्मविश्वास वाढला आहे आणि समाजाप्रती आपली जबाबदारी देखील अनेक पटींनी वाढली आहे.

सेवा सहयोगच्या ओळखीचा गाभा म्हणजे आमचे कर्मचारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवक आहेत. विविध क्षेत्रांतून आलेले हे लोक सामायिक कौशल्यांसह आणि अनुभवांसह एकाच ध्येयाने एकत्र आले आहेत: दुसऱ्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणे. त्यांच्या शांत आणि सातत्यपूर्ण समर्पणामुळेच सेवा सहयोग आज एक विश्वासार्ह आणि सक्षम संस्था म्हणून उभी राहिली आहे.

वर्ष २०२६ हे पहिल्या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक वर्षाचे (२००१) २५ वे म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्ष आणि जागतिक स्तरावर साजऱ्या केल्या जाणाऱ्या संयुक्त राष्ट्र स्वयंसेवक (United Nations Volunteers) कार्यक्रमाचे ५५ वे वर्ष आहे. हे जागतिक टप्पे आपल्याला स्वयंसेवेच्या शाश्वत ताकदीवर विचार करण्याचे आवाहन करतात. सेवा सहयोगमध्ये आमचा असा विश्वास आहे की स्वयंसेवा ही केवळ आकड्यांपेक्षा मानवी करुणा आणि कृतीच्या कथांमधून अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येते. "मानव सेवा हीच माधव सेवा" या आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे पालन करत, आम्ही मानतो की स्वयंसेवा हा एकत्र ऐकण्याचा, शिकण्याचा आणि एकत्र वाढण्याचा एक दुहेरी प्रवास आहे.

हा सुंदर प्रवास शब्दबद्ध करण्यासाठी, आम्हाला 'कॅलिडोस्कोप ऑफ सेवा' (KALEIDOSCOPE OF SEVA) सादर करताना अत्यंत अभिमान वाटत आहे. हे प्रकाशन म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, किशोरवयीन मुली, शेतकरी, ग्रामीण महिला आणि दुर्गम शाळांमधील खऱ्याखुऱ्या यशोगाथांचा संग्रह आहे. हे प्रकाशन सामूहिक कृतीच्या परिवर्तनीय शक्तीवर प्रकाश टाकते आणि हे दर्शवते की कशा प्रकारे पूर्वीचे लाभार्थी बऱ्याचदा त्यांना मिळालेल्या संधीची परतफेड करण्यासाठी आणि त्या पुढे नेण्यासाठी स्वयंसेवक म्हणून परत येतात. या कथा कोणत्याही एका व्यक्तीच्या शौर्याच्या नाहीत, तर काळजी आणि समुदाय सक्षमीकरणाचा सूक्ष्म मार्ग निवडणाऱ्या विनम्र सामान्य लोकांच्या आहेत.

आमच्या या प्रवासाचा आढावा घेताना, आम्ही आमचे देणगीदार आणि सीएसआर भागीदारांच्या उदार पाठिंब्याबद्दल आणि विश्वासाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ज्या समुदायांनी आम्हाला त्यांच्यासोबत चालण्याची संधी दिली, तसेच या उपक्रमांना दररोज प्रत्यक्षात आणणाऱ्या आमच्या भागीदार संस्थांचे आम्ही तितकेच आभारी आहोत.

आम्हाला जाणीव आहे की आमचा कॅलिडोस्कोप कधीही पूर्ण होत नाही. नवीन लोक जोडले जातील, नवीन आव्हाने निर्माण होतील आणि सेवेच्या नवीन संधी खुल्या होतील, परंतु आमचे मूळ ध्येय नेहमीच कायम राहील. 'सेवा सहयोग'चे सुवर्ण अध्याय अजून लिहिले जायचे आहेत आणि आम्हाला पूर्ण विश्वास आहे की ते आमच्या समर्पित स्वयंसेवकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या हृदयाच्या आणि हातांच्या माध्यमातूनच लिहिले जातील!

— संचालक मंडळ, सेवा सहयोग फाउंडेशन

सेवा सहयोग फाऊंडेशन
आम्ही चालवू हा पुढे वारसा...

'सेवा सहयोग फाऊंडेशन' ही केवळ एक संस्था नसून समाजपरिवर्तनाची आणि आशेची ज्योत आहे. 'सेवा' आणि 'सहयोग' या मूल्यांवर अधिष्ठित असलेल्या या संस्थेने लाखो गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवून अनेक आयुष्यांना नवी दिशा दिली आहे.

'मानवतेचा उत्सव साजरा करणे' (To Celebrate Humanity) या ध्येयाने प्रेरित होऊन, समाजात योगदान देऊ इच्छिणारे 'उदयोन्मुख घटक' आणि संधीच्या शोधात असणारा 'संघर्षमय समाज' यांमधील अंतर मिटवून शाश्वत सामाजिक बदल घडवणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. २००७ मध्ये पुणे आणि मुंबईतील काही सामाजिक भान जपणाऱ्या नागरिकांनी या अध्यायाची सुरुवात केली. मुंबईत एका लहानशा ६० स्क्वेअर फूट खोलीतून आणि अवघ्या ३ कार्यकर्त्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आज शहरी व ग्रामीण भागात पसरलेल्या ६ कार्यालयांच्या सशक्त नेटवर्कमध्ये रूपांतरित झाला आहे. शिक्षण, सक्षमीकरण व पर्यावरण या तीन आयामांमध्ये चालत असलेल्या प्रमुख प्रकल्पांची थोडक्यात माहिती देताना आनंद होतोय.....

ग्रामविकास: पालघर, वाडा आणि रायगड भागात ५,००० + कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या संधी देऊन आत्मनिर्भर बनवले जात आहे.

पर्यावरण संवर्धन: 'सेवा किरण' द्वारे १९४ शाळांमध्ये सौरऊर्जा पोहोचवली असून, 'मियावाकी' पद्धतीद्वारे २४ ठिकाणी ९०,००० + देशी झाडे लावली आहेत.

'संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमी': या अकॅडमी द्वारे अनेक खेळाडूंनी आतापर्यंत १,७०० + पदके व ट्रॉफी जिंकल्या आहेत.

विज्ञान, तंत्रज्ञान: महाराष्ट्र, लडाख, हिमाचल, आसाम व उत्तराखंडच्या दुर्गम भागांत 'छोटे सायंटिस्ट', STEM आणि डिजिटल लर्निंगद्वारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे.

विद्यार्थी विकास योजना: या उपक्रमातून आजपर्यंत २,८९५ विद्यार्थ्यांची करिअरची वाट सुकर झाली आहे.

स्कूल किट ड्राईव्ह: २००९ मध्ये अवघ्या ३,००० किट्सपासून सुरू झालेली ही मोहीम आज ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे.

शिक्षा विकास: महाराष्ट्रातील १४१ हून अधिक शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरवून ३४,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना लाभ पोहोचवला आहे.

समुत्कर्ष अभ्यासिका: ९ विभागांमधील १६३ अभ्यासिकांद्वारे ३,६५०+ बालकांना शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी आधार दिला जात आहे.

किशोरी विकास: एमएमआरडीए ते कोकणापर्यंत १० विभागांतील २,४९९ + मुलींना मार्गदर्शन व सक्षमीकरण केले जात आहे.

याशिवाय : विज्ञान केंद्र, बुक बँक, डिजिटल लर्निंग सेंटर, सेवा स्वास्थ्य व शाळा निर्माण यासारखे अनेक उपक्रम अविरत सुरू आहेत. (प्रत्येक प्रकल्पाची अधिक सांख्यिक माहिती सोबतच्या पानांमध्ये विस्तृत मांडली आहेच.)

सेवा सहयोग फाउंडेशनची ही कहाणी केवळ आकडेवारीची नसून, 'माणुसकी, समर्पण आणि सकारात्मक बदलाची' एक प्रेरणादायी यशोगाथा आहे! चला, एकत्र येऊ या... 'सेवेच्या' माध्यमातून आशेचा किरण पसरवू या आणि 'सहयोगाने' आयुष्य समृद्ध करू या!

अनुक्रमणिका

संचालक मनोगत: या हृदयीचे...

सेवा सहयोग फाउंडेशन: आम्ही चालवू हा पुढे वारसा

प्रेरणास्त्रोत...

समुत्कर्ष अभ्यासिका

ग्राम विकास

शिक्षा विकास

पर्यावरण

संजय हेगडे क्रीडा अकादमी

किशोरी विकास

विद्यार्थी विकास

विज्ञान आणि तंत्रज्ञान

स्वयंसेवकांचा सहभाग

...आम्ही ऋणी आहोत

समुत्कर्ष अभ्यासिका प्रकल्प

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समुदायाला एकत्र आणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार भारतीय ज्ञानपरंपरेचा अवलंब करत मुलांच्या शैक्षणिक वाढीसाठी आणि त्यांच्यातील कुतूहल जागृत करण्यासाठी अभ्यासिकांच्या माध्यमातून पाठबळ देणे.

सुरुवात

या प्रकल्पाची सुरुवात **२०१५** मध्ये केवळ **५** केंद्रे, **१२८** विद्यार्थी आणि **एका** शैक्षणिक झोनमधून झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२०१५-१६

५ सामुदायिक शिक्षण केंद्रे, १२८ विद्यार्थी आणि १ शैक्षणिक झोनसह उपक्रमाचा शुभारंभ.

प्रकल्पाचा विस्तार

विद्यार्थ्यांची संख्या १२८ वरून ३,६५० पर्यंत वाढली.

विस्तारित पोहोच

हा प्रकल्प ९ शैक्षणिक क्षेत्रांमध्ये आणि १६३ सामुदायिक शिक्षण केंद्रांपर्यंत विस्तारला आहे.

उत्क्रांती / प्रगती

केवळ स्कूल किट वाटपापासून ते मासिक मूल्यांकन, विद्यार्थ्यांचे ऑडिट, नेतृत्व प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन, 'फर्स्ट इन मॅथ' (First in Math) आणि शिष्यवृत्ती परीक्षा तयारीपर्यंत प्रगती झाली.

प्रमुख उपक्रम

अभ्यासिकांचे संचालन
मासिक मूल्यमापन
नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम
करिअर मार्गदर्शन आणि
'फर्स्ट इन मॅथ' उपक्रम
शिष्यवृत्ती परीक्षांची तयारी
शिक्षक, पालक आणि समुदाय सहभाग

लाभार्थी व्याप्ती

शैक्षणिक झोन | **९**

केंद्रांच्या माध्यमातून | **१६३**

विद्यार्थी | **३,६५०**

भविष्यातील वाटचाल

पुढील टप्प्यात शिकण्याच्या प्रगतीवर अधिक भर देणे, शैक्षणिक प्रगती बरोबरच उत्तम व्यक्तिमत्त्व घडविणे,पालकांचा सहभाग वाढवणे आणि शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचे नियोजन आहे.

प्रेरणादायी प्रवास

पूर्व मुंबईतील टोलेजंग इमारतींच्या छायेत वसलेल्या पवईच्या सूर्यानगरमधील दाटीवाटीच्या झोपडपट्टी वस्तीत २०२३ पासून सिद्धार्थ अभ्यासिका कार्यरत आहे. घरकामाचा व्याप, लहान मुलांना सांभाळणे, पाणी भरणे तसेच अभ्यासाची नावड आणि सुविधांचा अभाव अशा अनेकानेक आव्हानांमुळे वंचित मुलांसाठी अभ्यासिका चालवणे अत्यंत कठीण होते. मात्र, समर्पित शिक्षिका शीला निकाळजे यांनी हार मानली नाही.

जागेची समस्या आणि अनास्थेवर मात करत त्यांनी प्राथमिक व माध्यमिक गटांत अभ्यासिका सुरू ठेवली. इतकेच नव्हे, तर एकल पालक असलेल्या शीलाताईंनी स्वखर्चाने घरावर मजला बांधून अभ्यासिकेसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून दिली.

या अथक परिश्रमांचे फलित म्हणजे, ज्या मुलांनी पूर्वी कधी सहभाग घेतला नव्हता, त्यांनी २०२६ च्या समुत्कर्ष वार्षिकोत्सवातील आंतर-विभागीय (Inter-Zonal) नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला! यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, वस्तीमध्ये, पालकांमध्ये शीलाताई बद्दल विश्वास वाढला. आज मुलांना अभ्यासाचीदेखील गोडी लागली आहे, त्यांची नियमितता वाढली आहे हीच विशेष उपलब्धी आहे.

आज सिद्धार्थ अभ्यासिका ही केवळ अभ्यासिका न राहता संघर्षातून यशाकडे वाटचाल करणारी एक चळवळ बनली आहे. दुर्लक्षित वस्तीत बदलाची ज्योत पेटवणाऱ्या या अभ्यासिकेचा आणि शीलाताईंच्या समर्पणाचा आज सूर्यानगर परिसरात गौरव होत आहे.



तेजस्विनी



कर्जतच्या बारणे गावातील शेतकरी कुटुंबातील महेश्वरी भास्कर मुने हिचा प्रवास जिद्द आणि परिश्रमाची उत्तम साक्ष देणारा आहे. सोंडाई अभ्यासिकेत तिसरीपासून येणारी महेश्वरी आज ९ वीत शिकणारी एक चुणचुणीत आणि हुशार विद्यार्थिनी आहे.

२०२४ मध्ये, इयत्ता ८ वीत असताना तिला अभ्यासिकेमार्फत NMMS (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेची माहिती मिळाली. शिक्षिका रेश्मा मुने यांच्या मार्गदर्शनाखाली, नियमित सराव चाचण्या आणि सोप्या पद्धतींमुळे कठीण वाटणारा अभ्यासही तिच्या आवडीचा बनला. कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि स्वतःच्या चिकाटीच्या बळावर तिने २०२५ च्या NMMS परीक्षेत ७३% गुण मिळवत मेरीट लिस्टमध्ये स्थान मिळवले.

या यशामुळे मार्च २०२६ पासून तिला दरमहा ₹१,००० शिष्यवृत्ती सुरू झाली असून, पुढील ४ वर्षे मिळणाऱ्या या अर्थसाहाय्याने तिच्या १२ वीपर्यंतच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे.

महेश्वरीची यशोगाथा सर्वच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. गेल्या तीन वर्षांपासून आपण NMMS ची तयारी करून घेण्यास सुरुवात केली. कुठलेही विशेष प्रशिक्षण नसताना आपल्या अभ्यासिका शिक्षकांनी या मुलांची तळमळीने तयारी करून घेतली आणि विद्यार्थ्यांनी देखील छान प्रतिसाद दिला. तीन वर्षात परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ग्रामीण भागातील ५५ व शहरी विद्यार्थ्यांमध्ये १६ जण उत्तीर्ण झाले आणि ५ जणांना मेरीट शिष्यवृत्ती मिळाली. हे ५ विद्यार्थी आता नियमित चार वर्षे शिष्यवृत्ती घेतील याचा आम्हाला झालेला आनंद काही औरच आहे.

सेवा आणि सहयोग याचा सुंदर मिलाप ...

सफाळे येथील तांदुळवाडी गावातील हर्षाली बरफ २०१८ मध्ये, इयत्ता आठवीत असताना सेवा सहयोगच्या अभ्यासिका आणि किशोरी विकास वर्गाशी जोडली गेली. सेवा सहयोगच्या कार्यकर्त्यांचे काम जवळून पाहताना तिच्याही मनात समाजकार्याची आवड निर्माण झाली. त्यांच्या मार्गदर्शनातून तिने DSW अभ्यासक्रम पूर्ण केला आणि पुढे B.A. (Rural Development) चे शिक्षण घेतले.

उच्च शिक्षण सुरू ठेवण्यासाठी सेवा सहयोगच्या कार्यकर्त्यांनी तिला 'स्वयम्' योजनेतून आर्थिक सहाय्य मिळवण्यास मदत केली. तसेच B.A.च्या द्वितीय व तृतीय वर्षासाठी तिला प्रत्येकी ₹४०,००० शिष्यवृत्ती मिळाली.

हर्षालीने मीरा-भाईंदर महानगरपालिकेत पाच महिन्यांची Paid Internship पूर्ण करून प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. आज ती स्वतः सेवा सहयोगची कार्यकर्ती म्हणून विविध गावांमध्ये किशोरी वर्ग घेत असून मुलींना शिक्षण आणि भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन करत आहे. गेले ९ वर्ष तिचा विद्यार्थी, स्वयंसेवक ते झोकून देणारी कार्यकर्ती असा प्रवास अचंबित करणारा आहे.

कधीकाळी विद्यार्थी म्हणून मार्गदर्शन घेणारी हर्षाली आज इतर मुलींना पुढे जाण्याची दिशा देत आहे.



बहुगुणी...

बोईसर विभागातील शिवप्रताप अभ्यासिकेत २०१९ पासून येत असलेली सानिका महेंद्र जिंभळ ही आज १० वीत शिकत असून सातत्य, शिस्त आणि अभ्यासू वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे.

गेली सात वर्षे नियमित येणाऱ्या सानिकाने अभ्यासासोबत शाळेत कबड्डीमध्ये नैपुण्य मिळवत, नृत्यातही चमकदार कामगिरी केली आहे. समुत्कर्ष वार्षिकोत्सवात वेगवेगळ्या स्पर्धातून सतत प्रथम क्रमांक पटकावण्यासोबतच, तिने ठाण्याच्या 'कलांकुर करंडक' राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत सलग तीन वर्षे (२०२३ ते २०२६) सेवा सहयोगचे प्रतिनिधित्व करत पारितोषिके जिंकली. या सर्वांगीण प्रगतीमुळे तिला २०२५-२६ समुत्कर्ष प्रकल्पांतर्गत " सर्वोत्कृष्ट विद्यार्थी" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सानिकातील नेतृत्वगुण तिच्या वर्तनातून स्पष्ट दिसतात. ती स्वतः शिकण्यासोबतच अभ्यासिकेत नियमित स्वयंसेवक म्हणून काम करते, लहान विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करते आणि शिक्षकांना सहकार्य करते.

"अभ्यासिकेमुळे आमच्या मुलीत आत्मविश्वास आणि उत्तम संस्कार रुजले," असे तिचे पालक अभिमानाने सांगतात. सानिकाचा हा प्रेरणादायी प्रवास म्हणजे सेवा सहयोगच्या कार्याची खरी पावती आहे!



समर्पण



जून २०१९ मध्ये ठाण्याच्या मनकर्णिका अभ्यासिकेत एम.कॉम, बी.एड. शिक्षण झालेल्या उमा गणेशन् ताईंचे आगमन झाले. तामिळनाडूतून ठाण्यात आलेल्या उमाताईंना मराठी तर दूरच, हिंदी भाषाही येत नव्हती. परंतु, सेवाभावाची प्रामाणिक तळमळ भाषेच्या सीमांहून कितीतरी मोठी असते!

सुरुवातीला इंग्रजीतून संवाद साधत त्यांनी आठवड्यातून दोनदा मुलांचे इंग्रजी व गणित घेण्यास सुरुवात केली. मुलांकडून मराठी-हिंदी शब्द ऐकत आणि शिकत, आज त्या उत्तम हिंदी बोलतात व मराठी शिकत आहेत! भरतनाट्यम् विशारद असलेल्या उमाताईंनी अभ्यासिकेतील मुलींना नृत्याचे धडे दिले, तर देशभक्तीपर गीतांमध्येही त्या मुलांसोबत तितक्याच जोशात सहभागी होतात.

कोविडच्या कठीण काळात ऑनलाईन असो वा कोविडनंतरची ६ वर्षे रोजचे वर्ग असोत लक्ष, ताईंची उपस्थिती सदैव असते. भाषेचा अडसर बाजूला सारून गेली ७ वर्षे अखंड सेवा देणाऱ्या उमाताईंसारखे समर्पित स्वयंसेवक हेच सेवा सहयोगचे खरे वैभव आहेत!

आधार स्तंभ

पश्चिम मुंबईतील पन्हाळा अभ्यासिकेच्या साक्षी दोर्लेकर या २०२३ पासून कार्यरत असलेल्या समुत्कर्ष प्रकल्पातील एक समर्पित आणि ध्येयवादी शिक्षिका आहेत.

२०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला अभ्यासिकेची जागा बदलावी लागली तेव्हा, साक्षी यांनी अवघ्या दोन दिवसांत स्थानिक नागरिकांशी संवाद साधून नवीन जागेची व्यवस्था केली. वार्षिकोत्सव काळात सरावासाठी स्वयंसेवक नसताना, त्यांनी स्वतःच्या पगारातून मानधन देऊन स्वयंसेवकाची सोय केली. तोच स्वयंसेवक आज त्यांच्या प्रेरणेने अभ्यासिका शिक्षक म्हणून रुजू झाला आहे.

कौटुंबिक व आर्थिक अडचणींमुळे काम सोडण्याचा दबाव आला, तरी धैर्याने कुटुंबाचा विश्वास जिंकत त्यांनी आपले शिक्षण आणि अभ्यासिकेचे काम सुरू ठेवले. अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण कोर्स देखील पूर्ण केला. साक्षी यांचे समर्पण, चिकाटी आणि नेतृत्वगुण त्यांना सेवा सहयोगच्या टीममधील एक प्रेरणादायी कार्यकर्ती बनवतात!



शांत स्वभावातून यशाकडे

SS नवी मुंबईतील ऊर्जा अभ्यासिकेत ऑगस्ट २०२३ मध्ये प्रवेश घेतलेली, एका सामान्य कुटुंबातील निशा धनाजी पवार (इयत्ता १० वी) हिचा प्रवास जिद्द आणि परिश्रमाची उत्तम साक्ष देणारा आहे.

सुरुवातीला शांत आणि संकोची असलेल्या निशाची अभ्यासातील आवड ओळखून शिक्षक बिपिन मिश्रा यांनी तिच्या पालकांशी संवाद साधला आणि तिच्यातील क्षमतांना प्रोत्साहन दिले. बालमित्र सत्रे, सपोर्ट क्लास आणि नियमित मार्गदर्शनामुळे तिचा आत्मविश्वास दुणावला. निशाच्या सातत्यपूर्ण मेहनतीला उज्ज्वल यश मिळाले:

- शालेय परीक्षा (९ वी): ९०.८३% गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक
- मंथन परीक्षा: केंद्रस्तरावर १ ला, जिल्हास्तरावर ३१ वा, तर राज्यस्तरावर ७२ वा क्रमांक
- फर्स्ट इन मॅथ (FIM): संपूर्ण समुत्कर्ष प्रकल्पात द्वितीय क्रमांक
- जिल्हास्तरीय स्पर्धा: निबंध व घोषवाक्य स्पर्धेत तृतीय क्रमांक

शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, पालकांचा विश्वास आणि स्वतःची अपार मेहनत यांच्या बळावर एकेकाळी संकोची असलेली निशा आज आत्मविश्वासाने यशोशिखराकडे वाटचाल करत आहे!



समुत्कर्ष अभ्यासिका प्रकल्प - ‘कालचे लाभार्थी, आजचे आधारस्तंभ!’



२०१५-१६ मध्ये रोवलेले समुत्कर्ष अभ्यासिका प्रकल्पाचे छोटेसे रोपटे आज ५ ग्रामीण व ४ शहरी विभागांत पसरलेल्या १६३ अभ्यासिकांच्या भव्य वटवृक्षात रूपांतरित झाले आहे! दररोज दोन तास चालणाऱ्या या ज्ञानवर्गात केवळ शैक्षणिक विकासच नव्हे, तर मूल्यसंस्कार, राष्ट्रभक्ती आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले जातात. या १० वर्षांच्या अविरत ज्ञानयज्ञाचे सर्वात मधुर फळ म्हणजे - ‘कालचे लाभार्थी, आजचे आधारस्तंभ!’

२०२२ नंतरच्या अवघ्या ४ वर्षांत, अभ्यासिकेत शिकलेले ३६ माजी विद्यार्थी आज स्वतः ‘अभ्यासिका शिक्षक’ म्हणून सेवा देत आहेत. त्याहूनही अभिमानास्पद बाब म्हणजे, याच शिक्षकांमधून घडलेले ११ पूर्णवेळ कार्यकर्ते आज ‘विभाग समन्वयक’ (Zonal Coordinator) म्हणून संपूर्ण प्रकल्पाचे नेतृत्व करत आहेत! “आम्ही चालवू हा पुढे वारसा...” या दृढ निष्ठेने आणि तरुणाईच्या भक्कम साथीने समुत्कर्ष प्रकल्प यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत राहील, हा अढळ विश्वास आहे!

ग्राम विकास प्रकल्प

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

शाश्वत शेती, उपजीविका, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणातून ग्रामीण जीवनमान उंचावणे. स्थानिक संसाधने व कौशल्यांचा विकास करून कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे. या प्रयत्नांतून स्वयंपूर्ण, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती करणे.

सुरुवात

पाणी प्रश्नाची भविष्यातील तीव्रता लक्षात घेत **२०१८** मध्ये जलसंधारण आणि वृक्षारोपण उपक्रमांनी या प्रकल्पाची सुरुवात झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२०१८

जलसंधारण आणि वृक्षारोपण उपक्रमांना सुरुवात.

सामुदायिक जनजागृती

गावाच्या शाश्वत विकासात गावकऱ्यांचा थेट सहभाग वाढवण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबवण्यात आले.

कौशल्य प्रशिक्षण आणि शेतकरी शिक्षण

शेतकऱ्यांसाठी कौशल्य विकास आणि शेती क्षेत्रातील आधुनिक शिक्षणाचा विस्तार करण्यात आला.

एकात्मिक ग्रामीण विकास

सफाळे, बोईसर आणि महाडमधील गावांमध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांची सांगड घालण्यात आली.

प्रमुख उपक्रम

शेती शाळा उपक्रम
उद्योजकता विकास कार्यक्रम
कौशल्य विकास उपक्रम
महिला सक्षमीकरण वर्ग
डिजिटल लर्निंग सेंटर
आरोग्य रक्षक
अन्नपूर्णा पोषण उपक्रम
अंगणवाडी सहाय्य उपक्रम
न्यूट्रिशन किचन गार्डन
एकात्मिक ग्रामीण विकास

लाभार्थी व्याप्ती

शेतकरी	१,७३१
महिला	१,८१०
विद्यार्थी	१,४००
एकूण लाभार्थी	४,९४१

भविष्यातील वाटचाल

पुढील टप्प्यात ग्रामीण पातळीवर नेतृत्व निर्माण करून आणि स्थानिक विकास आराखडे तयार करून एकात्मिक ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल.
गावच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी मातृशक्ती, युवाशक्ती, सामुदायिक सद्भावना आणि सामूहिक प्रयत्नांना सक्रिय करणे हे आमचे स्वप्न आहे.



“मार्गदर्शन, सातत्य आणि जिद्दीने फुलवलेली परसबाग”

पालघर तालुक्यातील बोईसर येथील खुताड गावातील अनिता गोवारी ताई यांना सुरुवातीला कमी जागा, पाण्याचा अभाव आणि कुंपण नसल्यामुळे परसबाग तयार करण्याबाबत साशंकता होती.

सेवा सहयोगच्या ग्रामविकास प्रकल्पांतर्गत दर्शना उंबरकर ताईंनी २०२५ मध्ये अनिता ताईंना परसबागेचे महत्त्व आणि कमी जागेत भाजीपाला पिकवण्याचे तंत्र समजावून सांगितले. बियाणे पुरवठा, नियमित मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण भेटींमुळे अनिता ताईंनी घरासमोरील छोट्याशा जागेत परसबाग सुरू केली.

आज त्या मिरची, टोमॅटो आणि वांग्यांची यशस्वी लागवड करत आहेत. यामुळे त्यांच्या कुटुंबाला ताज्या, पौष्टिक भाज्या तर मिळत आहेतच, शिवाय आठवड्याला ₹१०० ते ₹२०० ची बचत होत आहे. उरलेल्या भाज्यांची विक्री करून त्यांनी आतापर्यंत ₹८००+ ची अतिरिक्त कमाई देखील केली आहे. जरी ही रक्कम छोटी दिसत असली तरी त्यातून मिळालेला आत्मविश्वास अमूल्य आहे. “हे जमेल का?” असा प्रश्न विचारणाऱ्या अनिता ताई आज स्वावलंबी बनल्या आहेत. योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून लहानशा जागेतही पोषण, बचत आणि आत्मविश्वासाची क्रांती घडू शकते, हेच या प्रवासाने सिद्ध केले आहे!

कष्टाचे सोने

पालघर जिल्ह्यातील सफाळे नजीकच्या वसरे गावातील सुभाष धोदडे हे मेहनती शेतकरी २०२५ च्या खरीप हंगामात सेवा सहयोग फाउंडेशनशी जोडले गेले. नवीन पद्धती स्वीकारण्याच्या वृत्तीमुळे त्यांनी ३६ गुंठे क्षेत्रावर दुधी, काकडी, शिराळी, गलका आणि भेंडीची यशस्वी लागवड केली.

संस्थेच्या शेती शाळेतील मार्गदर्शनानुसार त्यांनी प्रथमच मल्चिंग पेपर, दशपर्णी अर्क आणि रामबाण या सेंद्रिय कीड नियंत्रणाचा प्रभावी वापर केला. यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहिला, तण नियंत्रण झाले आणि पिकांची गुणवत्ता उत्तम राहिली.

या आधुनिक व सेंद्रिय तंत्रज्ञानाच्या वापराने २०२५-२६ च्या हंगामात त्यांनी काकडी १,०४८ किलो, शिराळी ५६४ किलो, दुधी व गलका, ४४८ किलो, भेंडी ११५ किलो असे घसघशीत उत्पादन घेत ₹९३,९६० चे घसघशीत उत्पन्न मिळवले! आजही ते आपल्याशी स्वयंसेवक या नात्याने सक्रिय जोडलेले आहेत.

सेवासहयोग, पत्नी आणि दोन मुलींच्या साथीने घडलेली ही यशोगाथा म्हणजे योग्य प्रशिक्षण, संपूर्ण कुटुंबाची मेहनत आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा सुंदर संगम आहे.



पडलो, शिकलो, फुललो !

पालघर जिल्ह्यातील सफाळे परिसरातील लहान उचावली गावातील प्रवीण सुरेश किंडरा हे एक प्रयोगशील तरुण शेतकरी आहेत. सन २०२२ मध्ये सेवा सहयोगच्या ग्रामविकास प्रकल्पांतर्गत गावात शेती शाळा सुरू झाली आणि त्यांनी २५० झेंडूच्या रोपांची लागवड केली.



संस्थेने दिलेला फुले तोडण्याचा सल्ला न मानता “झेंडूला फक्त दसऱ्यालाच चांगला भाव मिळतो” या गैरसमजामुळे त्यांनी फुले वेळेवर तोडली नाहीत. परिणामी, ५०% पिकाचे नुकसान झाले. परंतु, प्रवीण दादा खचून गेले नाहीत; त्यांनी या चुकीतून धडा घेतला.

सन २०२३ मध्ये त्यांनी संस्थेच्या मार्गदर्शनानुसार दशपर्णी अर्क, लेंडी खत आणि वेस्ट डी-कंपोझरचा योग्य वापर केला. नियमित निरीक्षण व योग्य व्यवस्थापनामुळे त्यांच्या घराला झेंडूचे सौंदर्य लाभले.

या वेळी त्यांनी १२० किलो फुलांचे घसघशीत उत्पादन घेतले. ९० किलो फुलांना प्रति किलो ₹१२० भाव मिळाला, तर ३० किलो फुलांची तोरणे करून त्यांनी विरार व जोगेश्वरीच्या बाजारात विक्री केली. योग्य मार्गदर्शन, चुका सुधारण्याची वृत्ती आणि वेळेवर केलेले नियोजन यामुळे प्रवीण दादांनी 'पिवळे सोने' पिकवून यशाचा मार्ग गवसला! प्रवीणदादा आज देखील आपल्याशी जोडलेले आहेत आणि सेंद्रिय शेतीचे कट्टर पुरस्कर्ते बनलेत.

पाटील पाडा: आशा, शिक्षण आणि सक्षमीकरणाचा प्रवास

सामाजिक बदल एका रात्रीत घडत नाही, तर तो सातत्यपूर्ण प्रयत्नांतून येतो. पालघर जिल्ह्यातील बोईसर येथील ८८ कुटुंबांचा 'पाटील पाडा' याचे उत्तम उदाहरण आहे. २०१८ मध्ये सेवा सहयोग फाउंडेशन आणि मार्गदर्शक संजय हेगडे यांच्या पुढाकाराने येथे विकासाची पहाट उजाडली



शिक्षण व डिजिटल क्रांती

आधुनिक अभ्यासिकेत दररोज ८५ हून अधिक मुले येतात. 'बिरसा मुंडा डिजिटल सेंटर'द्वारे ३० हून अधिक विद्यार्थ्यांनी संगणक प्रशिक्षण पूर्ण केले आहे.


किशोरी सक्षमीकरण

२०१९ पासून सुरू झालेल्या किशोरी वर्गांत ४५ हून अधिक मुली आरोग्य, पोषण आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे घेत असून पथनाट्यांद्वारे जनजागृती करत आहेत.

महिला रोजगार

शिवणकाम प्रशिक्षणातून ५५ महिला स्कूल किट्स व पिशव्या बनवत आहेत, तर 'महालक्ष्मी गृहउद्योगा'द्वारे लाडू बनवून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत.

पूर्वी गरिबी आणि स्थलांतराने त्रस्त असलेला पाटील पाडा आज शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या बळावर सक्षम बनला आहे! !





आरोग्य रक्षक : गावोगावी आरोग्याची नवी दिशा

पालघर जिल्ह्यातील बोईसर आणि सफाळे परिसरातील आदिवासी वाड्यांमध्ये मूलभूत वैद्यकीय सुविधांचा तीव्र अभाव होता. या पार्श्वभूमीवर २०२३ मध्ये सेवा सहयोगतर्फे "आरोग्य रक्षक" उपक्रमाची सुरुवात झाली.

२०२४ पासून पाटील पाडा, पाणी पाडा, खटलपाडा, रामपाडा, दिंडिपाडा आणि गोठन पाडा या ६ वाड्यांमध्ये स्थानिक तरुण मुलींची 'आरोग्य रक्षक' म्हणून निवड करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देऊन त्यांना मूलभूत औषधोपचारांची किट देण्यात आली.

या उपक्रमाचे फलित:

- **५९५ लोकांना प्राथमिक औषधोपचार पुरवले.**
- **४७३ लोकांनी शिबिरांद्वारे स्वतःचा रक्तगट जाणून घेतला.**
- **वजन आणि रक्तदाब तपासणीची नियमित शिबिरे सुरू झाली.**

सकारात्मक बदल: सुरुवातीला संकोच करणारे गावकरी आता स्वयंस्फूर्तीने केंद्रात छोट्या समस्यांवर उपचार घेण्यासाठी येतात. दीर्घकाळ चालणाऱ्या वेदना, त्वचारोग आणि जखमांवर वेळेवर उपचार मिळाल्याने अनेकांना आराम मिळाला आहे. कालपर्यंत घरापुरत्या मर्यादित असणाऱ्या या ग्रामीण मुली आज संपूर्ण गावाच्या 'आरोग्य दूत' बनल्या आहेत. या उपक्रमामुळे "आरोग्य हीच खरी संपत्ती" हा विचार पाड्यांवर रुजत असून, ग्रामीण आरोग्यात सकारात्मक बदल घडत आहे.

महाड येथे सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे २०२५ पासून महिला उद्योजकता प्रकल्प राबवला जात आहे. या अंतर्गत घेतलेल्या Advanced Beautician Course मुळे दासगावच्या भूमिका मंगेश उकिर्डे या १२ वी उत्तीर्ण तरुणीच्या स्वप्नांना नवी दिशा मिळाली.

पूर्वी बेसिक कोर्स करून ती नोकरी करत होती; परंतु १२ तास काम करूनही महिन्याला केवळ ₹५,००० उत्पन्न मिळत होते. प्रशिक्षक सांची खोपकर ताईंमुळे ती सेवा सहयोगच्या उपक्रमाशी जोडली गेली. येथे कौशल्य प्रशिक्षणासोबतच तिला ₹२०,००० किमतीचे व्यवसाय साहित्य मोफत मिळाले.

या मदतीमुळे आत्मविश्वासाने तिने स्वतःच्या ऑर्डर्स घेणे सुरू केले. डिसेंबर ते जून २०२५-२६ या कालावधीत भूमिकाने ₹७०,००० हून अधिक कमाई केली असून, आता तिचे मासिक उत्पन्न नोकरीच्या तुलनेत दुप्पट झाले आहे.

पूर्वी कमी पगारासाठी झटणारी भूमिका आज स्वतःच्या मेहनतीने स्वावलंबी बनली आहे. सेवा सहयोगच्या मार्गदर्शनामुळे एक साधी तरुणी आज यशस्वी उद्योजिका म्हणून आत्मविश्वासाने उभी आहे!

भूमिका: कर्तृत्वाची नवी ओळख !



शिक्षा विकास प्रकल्प

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

समाजाची गरज ओळखून शिक्षणाची उपलब्धता वाढवणे, शाळांच्या पायाभूत सुविधा सुधारणे, पात्रता व क्षमता असणा-या गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे.

सुरुवात

२००८-०९ मध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यासाठी 'स्कूल किट' उपक्रमाद्वारे या प्रवासाची सुरुवात झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२००८-०९
स्कूल किट उपक्रमाची सुरुवात.

२०१५-१६
स्कूल इन्फ्रास्ट्रक्चर (शालेय पायाभूत सुविधा विकास) उपक्रमाची सुरुवात.
स्कूल किटव्यतिरिक्त इतर शैक्षणिक हस्तक्षेपांना सुरुवात.

२०१६-१७
स्कॉलरशिप (शिष्यवृत्ती) उपक्रमाचा प्रारंभ.

२०१८-१९
'राइड टू सेफ्टी' उपक्रमाची सुरुवात.

जुलै २०२६
शैक्षणिक प्रभावाचा हा प्रवास सातत्याने सुरू आहे.

प्रमुख उपक्रम

स्कूल किट सहाय्य
शालेय पायाभूत सुविधा विकास
शिष्यवृत्ती सहाय्य
राइड टू सेफ्टी उपक्रम
स्कूल किट पलीकडील शिक्षण-केंद्रित उपक्रम
शाळा, स्वयंसेवी संस्था आणि कॉर्पोरेट भागीदारांसोबत सहकार्य

लाभार्थी व्याप्ती

स्कूल किट | **८,६८,७३८ विद्यार्थी; १४ जिल्ह्यांमध्ये विस्तार**

शालेय पायाभूत सुविधा | **१४१ शाळांना मदत; ३४,११५ विद्यार्थ्यांना लाभ; ३०+ कॉर्पोरेट भागीदार**

शिष्यवृत्ती | **४१८ विद्यार्थ्यांना मदत**

राइड टू सेफ्टी | **८०,००० हेल्मेट्स वाटप; ३८३ शाळांमध्ये कार्यक्रम**

इतर शैक्षणिक उपक्रम
१,३२९ शाळा
३,७६,५७३ विद्यार्थी
८ जिल्हे, ३५ विविध प्रकारचे उपक्रम,
४०+ कॉर्पोरेट भागीदार

जुलै २०२६ पर्यंत एकूण प्रभाव
१२,८६,२४४+ विद्यार्थी,
१,४७०+ शाळा,
२२+ जिल्हे,
७०+ कॉर्पोरेट भागीदार

भविष्यातील वाटचाल

हा प्रकल्प विद्यार्थ्यांचे सहाय्य, पायाभूत सुविधांचा विकास, शिष्यवृत्ती, सुरक्षा उपक्रम आणि सहयोगी भागीदारी यांच्या समन्वयाने शैक्षणिक परिसंस्था मजबूत करणे सुरूच ठेवेल.

जिद्द, कष्ट आणि यशाची कहाणी

धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथील उत्कर्ष कोठावळे हा विलक्षण जिद्दीचा विद्यार्थी! अवघ्या ९ महिन्यांचा असताना वडिलांचे छत्र हरपले, तरी आईने शिवणकाम आणि फोन कॉलिंगच्या कामातून (मासिक उत्पन्न ₹५,०००) त्याचा सांभाळ केला.

यशाची देदीप्यमान शिखरे:

- **दहावी परीक्षा:** १००% गुण.
- **JEE परीक्षा:** ९९.१६ percentile (Physics मध्ये १००/१०० गुण).
- **NEET परीक्षा** : (२०२६): ९९.९४ percentile (AIR १०९१, EWS Category Rank ८०).
- प्रवेश मिळालेले महाविद्यालय: AIIMS ऋषिकेश येथे वैद्यकीय शिक्षण!
- इतर कला: गायनाच्या ५ परीक्षा उत्तीर्ण व उत्कृष्ट वक्ता.

प्रतिकूल परिस्थितीत कडप्पावर लिहून अभ्यास करणाऱ्या उत्कर्षला 'सेवा सहयोग'च्या पुढाकाराने अपोलो ग्लोबल management ची ₹७९,००० ची शिष्यवृत्ती मिळाली, ज्यामुळे शिक्षणाचा मार्ग सुकर झाला.

सेवा सहयोगने आतापर्यंत विविध कंपन्यांच्या माध्यमातून ४१८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देऊन त्यांची स्वप्ने साकार केली आहेत.



तमसो मा ज्योतिर्गमय!



महाराष्ट्रातील विकासापासून वंचित ग्रामीण शाळांमध्ये सेवा सहयोग फाऊंडेशनच्या माध्यमातून घडत आहे सकारात्मक परिवर्तन!

"ह. वि. पाटील, चिंचघर,वाडा" ही शाळा अशाच सकारात्मक परिवर्तनाची साक्षीदार ठरली. २०२५ मध्ये ग्रामीण भागातील या शाळेमध्ये आपण खालील कामे केली ज्यामुळे अतिशय सखोल परिणाम संपूर्ण शाळेच्या व्यवस्थापनावर, शिक्षकांवर तसेच विद्यार्थ्यांवर होऊन परिवर्तनाची वाटचाल सुकर झाली.

• परसबाग (आत्मनिर्भरतेसाठी) • रेन वॉटर हार्वेस्टिंग • स्वच्छ पिण्याचे पाणी स्टेशन • वर्गखोल्यांचे नूतनीकरण• नवीन वर्गखोल्यांची बांधणी • सोलर वीज प्रकल्प • प्रसाधनगृह सुविधा • ग्रंथालय उभारणी • 'झीरो टू इन्फिनिटी' गणित परीक्षा • करिअर मार्गदर्शन

सेवा सहयोग केवळ सिमेंट-विटांच्या वर्गखोल्या बांधण्यावर भर न देता, विद्यार्थ्यांच्या भौतिक व बौद्धिक विकासासाठी खालील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत आहे:

भक्कम पायाभूत सुविधा:

सुरक्षित, दुरुस्त इमारती, रंगीबेरंगी वर्गखोल्या आणि अखंड वीजपुरवठा.

आरोग्य आणि स्वच्छता:

स्वच्छ प्रसाधनगृहे, वैयक्तिक स्वच्छतेसाठी हँडवॉश स्टेशन्स आणि शुद्ध पिण्याच्या पाण्यासह 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'सारखे शाश्वत जलस्रोत.

बौद्धिक विकासाची साधने:

वैज्ञानिक प्रयोगशाळा, समृद्ध वाचनालये (ग्रंथालय) आणि आधुनिक शैक्षणिक साहित्य.

आजपर्यंत सेवा सहयोग च्या माध्यमातून १४१ शाळांमध्ये आपण बांधकामाशी संबंधित कामे केली आहेत ज्याच्यामुळे शैक्षणिक परिवर्तना साठी सखोल हातभार लागला आहे.

एका दप्तराने फुलविली हजारो स्वप्ने : सेवा सहयोगची शैक्षणिक चळवळ

सह्याद्रीच्या दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिलीच्या वर्गात येणाऱ्या मुलांच्या मनात शिक्षणाची जिद्द असली, तरी खांद्यावर हक्काचे दप्तर नसे. जुन्या कापडी पिशव्या किंवा खताच्या गोण्यांमधून साहित्याची वाहतूक करणाऱ्या या निरागस मुलांमधील न्यूनगंडाची भावना एका संवेदनशील शिक्षकाने ओळखली. त्यातूनच 'सेवा सहयोग' चा 'स्कूल किट' हा अत्यंत यशस्वी उपक्रम २००९ सालापासून अधिकृतपणे आकारास आला.





हा उपक्रम आज केवळ साहित्य वाटपापुरता मर्यादित राहिला नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारा झालाय. काळानुरूप या किटमध्ये पुढील नावीन्यपूर्ण बदल करण्यात आले:

दप्तराचे ओझे कमी: पहिली व दुसरीसाठी 'थ्री इन वन' वही आणि दगडी पाटी दिल्याने दप्तराचे ओझे कमी झाले व हस्ताक्षर सुधारले.

सर्वांगीण साहित्य: इंग्रजी अंकलिपी, चित्रकला वही, कलर्स, A4 वह्या , डिक्शनरी, ग्राफ बुक आणि आवश्यक स्टेशनरीचा समावेश.

सकारात्मक सामाजिक परिवर्तन: या उपक्रमामुळे ग्रामीण भागात विशेषतः वर्गखोलीतील गरीब-श्रीमंत भेद कमी होण्यास मदत झाली. काही जिल्ह्यात, शाळांमधील उपस्थिती वाढल्याने प्रेरित झालेल्या गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून शाळांमध्ये संगणक व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. अहिल्यानगर जिल्ह्यातील 'ज्ञानदीप प्रतिष्ठान' आणि 'आधार फाउंडेशन' यांसारख्या संस्था जोडल्या गेल्याने कामाची व्याप्ती वाढली. कोविड काळातही वह्यांचे वाटप अविरत सुरू होते.

प्रकल्पाची प्रमुख संख्यात्मक आकडेवारी (२००८ - २०२५):

- वार्षिक पोहोच: दरवर्षी १,००,००० विद्यार्थ्यांपर्यंत मदत.
- भौगोलिक विस्तार: महाराष्ट्रातील १४ जिल्हे.
- एकूण वितरण: आतापर्यंत ८,६८,७३८ शालेय साहित्य किट्सचे यशस्वी वाटप.

हजारो सेवाव्रतींच्या योगदानामुळे ही मोहीम आज तळागाळातील मुलांच्या स्वप्नांना आणि आत्मविश्वासाला बळ देणारी एक मोठी सामाजिक चळवळ बनली आहे.

पर्यावरण उपक्रम प्रकल्प

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

समाजाची गरज ओळखून शिक्षणाची उपलब्धता वाढवणे, शाळांच्या पायाभूत सुविधा सुधारणे, पात्रता व क्षमता असणा-या गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे.

सुरुवात

२००८-०९ मध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यासाठी 'स्कूल किट' उपक्रमाद्वारे या प्रवासाची सुरुवात झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम (सौर ऊर्जा प्रकल्प)

२०१८ ते २०२३

८२ शाळांमध्ये सौर पॅनेलची यशस्वी स्थापना.

२०२४ ते आतापर्यंत:

११२ शाळांमध्ये सौर पॅनेलची यशस्वी स्थापना.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम (नागरी वनीकरण)

२०१८ ते २०२

११ ठिकाणी वनीकरण पूर्ण.

२०२४ ते आतापर्यंत

१८ ठिकाणी वनीकरण पूर्ण.

प्रमुख उपक्रम

मियावाकी नागरी वनीकरण
स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड
नागरी हरित क्षेत्रात वाढ
जैवविविधतेचे पुनरुज्जीवन
स्वयंसेवक आणि समुदाय सहभाग
शाळांमध्ये छतावरील सौर यंत्रणा उभारणे
स्वच्छ उर्जेची निर्मिती
पर्यावरण जनजागृती

लाभार्थी व्याप्ती

मियावाकी क्षेत्रे | **मुंबई महानगर प्रदेशात (MMR) २४ जंगले**
लागवड केलेली स्थानिक रोपे | **९१,९११**
व्यापलेले क्षेत्र | **२,८२,१६४ चौ. फूट.**
अपेक्षित लाभार्थी | **१,५०,००० नागरिक**
मियावाकी स्वयंसेवक | **१,०६२**
अपेक्षित वार्षिक CO2 घट | **९२ मेट्रिक टन प्रति वर्ष**
सौर ऊर्जा शाळा | **१९४ शाळा (२५% शहरी, ७५% ग्रामीण)**
विद्यार्थी आणि शालेय कर्मचारी पोहोच | **अंदाजे १,१९,२४२ व्यक्ती**
स्थापित सौर क्षमता | **८२३ kW**
अपेक्षित वार्षिक कार्बन उत्सर्जन घट | **मेट्रिक टन प्रति वर्ष**

भविष्यातील वाटचाल

हे उपक्रम अधिक हरित परिसर, स्वच्छ हवा, सौर उर्जेचा वापर, कमी कार्बन उत्सर्जन, मजबूत समुदाय आणि दीर्घकालीन पर्यावरण जनजागृतीला पाठिंबा देणे सुरूच ठेवतील.



काँक्रीटच्या जंगलातून हरित भविष्याकडे...

एकेकाळी ओसाड आणि दुर्लक्षित असलेले शहरी मोकळे भूभाग आज सेवा सहयोग फाउंडेशनच्या मियावाकी अर्बन फॉरेस्टेशन प्रोग्राममुळे हिरव्यागार, जैवविविधतेने समृद्ध वनराईत रूपांतरित झाले आहेत. आर्थिक वर्ष २०१८ ते २०२६ या कालावधीत कॉर्पोरेट CSR भागीदारांच्या सहकार्याने मुंबई महानगर प्रदेश तसेच उरण (रायगड) येथे २४ मियावाकी वनक्षेत्रे विकसित करण्यात आली. २,८२,१६४ चौ. फूट क्षेत्रावर ९१,९११ स्थानिक वृक्षांची लागवड करून शाश्वत हरित परिसंस्था निर्माण करण्यात आली.

या उपक्रमामुळे १.५ लाखांहून अधिक नागरिकांना स्वच्छ हवा, कमी तापमान आणि आरोग्यदायी पर्यावरणाच्या रूपाने लाभ होईल. तसेच ही वने पक्षी, फुलपाखरे आणि इतर जीवांसाठी सुरक्षित अधिवास ठरत आहेत. १,०६२ स्वयंसेवकांच्या सक्रिय सहभागामुळे पर्यावरण संवर्धनाची सामूहिक भावना अधिक बळकट झाली. ही वने परिपक्व झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ९२ मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेतील. हा उपक्रम समाज, उद्योग आणि समुदाय यांच्या संयुक्त प्रयत्नातून शाश्वत, हरित भविष्य घडविण्याचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

सेवाकिरण : स्वच्छ ऊर्जेकडून शाश्वत भविष्याकडे

आर्थिक वर्ष २०१८–२६ दरम्यान सेवा सहयोग फाउंडेशनने राबविलेला 'सेवाकिरण' सौर ऊर्जा प्रकल्प हा स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचा प्रभावी उपक्रम आहे. आजपर्यंत नियोजनबद्ध अंमलबजावणीद्वारे १९४ शाळांमध्ये (२५% मुंबई महानगर प्रदेश व ७५% ग्रामीण भाग) रूफटॉप सौर ऊर्जा प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या.

८२३ किलोवॅट क्षमतेच्या या प्रणालींमधून दरवर्षी सुमारे १०.४५ लाख युनिट स्वच्छ वीज निर्मिती अपेक्षित असून, १,१९,२४२ विद्यार्थ्यांना सुरक्षित, ऊर्जा-कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक शैक्षणिक वातावरणाचा लाभ मिळत आहे. या प्रकल्पामुळे शाळांच्या वीजखर्चात दरवर्षी सुमारे ₹१.२५ कोटींची बचत होऊन तो निधी प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण, ग्रंथालये आणि विद्यार्थी कल्याणासाठी वापरता येणार आहे. तसेच दरवर्षी ७३० मेट्रिक टन कार्बन उत्सर्जनात घट होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांमध्ये नवीकरणीय ऊर्जेबाबत जागरूकता निर्माण करत हा उपक्रम शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांचा आदर्श संगम ठरत आहे.



संजय हेगडे क्रीडा अकादमी

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

शिस्त, आत्मविश्वास, सांघिक भावना, नेतृत्व आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करत शिस्तबद्ध प्रशिक्षण, व्यावसायिक मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक अनुभवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण क्रीडा कौशल्यांना बळ देणे.

सुरुवात

कर्जत अकादमीची स्थापना नोव्हेंबर **२०१७** मध्ये झाली.

सानपाडा अकादमीची स्थापना **२६ फेब्रुवारी २०२२** रोजी झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

नोव्हेंबर २०१७
कर्जत क्रीडा अकादमीची स्थापना.

२६ फेब्रुवारी २०२२
सानपाडा क्रीडा अकादमीची स्थापना.

२०१७-२०२६
खेळाडूंचा तालुका, जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग आणि घवघवीत यश.

२०२२-२०२६
सानपाडा अकादमीच्या प्रगतीचा सुवर्णकाळ.

प्रमुख उपक्रम

नियमित क्रीडा प्रशिक्षण (Regular sports coaching)

स्पर्धात्मक अनुभव आणि सहभाग (Competitive exposure)

तांत्रिक कौशल्य विकास

शिस्त आणि आत्मविश्वासाची निर्मिती

सांघिक भावना आणि नेतृत्व विकास

विभागीय, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग

लाभार्थी व्याप्ती

अकादमीची ठिकाणे | **२ (कर्जत आणि सानपाडा)**

प्रशिक्षित सरासरी खेळाडू | **दरवर्षी एकत्रित ३२० खेळाडू**

कर्जत क्षेत्रातील शाळा | **१५ शाळा सहभागी**

कर्जत यश/पदके संख्या | **१,६६० विजय पदे**

कर्जत क्रीडा प्रकार | **धनुर्विद्या**
मैदानी खेळ
टेबल टेनिस, बॅडमिंटन, कुस्ती, वेटलिफ्टिंग, मल्लखांब, बुद्धिबळ

सानपाडा क्षेत्रातील शाळा | **४ शाळा सहभागी**

सानपाडा क्रीडा प्रकार | **धनुर्विद्या, मैदानी खेळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कराटे, बुद्धिबळ**

सानपाडा यश/पदके संख्या | **१४५ विजय पदे**

एकूण मिळून विजय पदे | **१,८०५ पदके आणि विजय पदे**

भविष्यातील वाटचाल

ही अकादमी दोन्ही क्रीडा केंद्रांमध्ये तळागाळातील खेळाडूंना कसदार प्रशिक्षण, स्पर्धात्मक संधी आणि सर्वांगीण विकास प्रदान करणे सुरूच ठेवेल.

एका धनुष्याने दिली स्वप्नांना नवी भरारी

साध्या कुटुंबातून आलेल्या राजनंदिनी तिर्थराज गौतम हिची वाटचाल जिद्द, मेहनत आणि योग्य संधी मिळाल्यास स्वप्ने कशी साकार होतात याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. अकरावीत प्रवेश घेतल्यानंतर तिने संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमी, सानपाडामध्ये तिरंदाजीचे प्रशिक्षण सुरू केले. साध्या लाकडी धनुष्याने सुरुवात करत तिने पहिल्याच जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आणि पुढे विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्येही उल्लेखनीय यश संपादन केले.

ऑगस्ट २०२५ मध्ये सेवा सहयोग फाउंडेशनने तिला व्यावसायिक रिकर्व्ह बो उपलब्ध करून दिला. या संधीचे तिने सुवर्णसंधीत रूपांतर करत विद्यापीठस्तरीय तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक पटकावले, वरिष्ठ निवड चाचणीत प्रथम क्रमांक मिळवला आणि अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड मिळवली.

कठोर सराव, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि चिकाटीच्या बळावर राजनंदिनी आज अनेक मुलींसाठी प्रेरणास्थान बनली आहे. योग्य संधी मिळाल्यास आर्थिक मर्यादा यशाच्या आड येत नाहीत, हे तिच्या प्रवासाने सिद्ध केले आहे.





रस्त्यावरच्या धावण्यापासून सुवर्ण स्वप्नांपर्यंत : कृष्णाची प्रेरणादायी भरारी

कर्जतमधील साध्या कुटुंबातील कृष्णा किशोर जाधव याची कथा जिद्द, मेहनत आणि योग्य संधीची प्रेरणादायी कहाणी आहे. लहानपणापासून धावण्याची आवड असलेल्या कृष्णकडे मैदान, प्रशिक्षक किंवा आवश्यक सुविधा नव्हत्या. तो गावातील रस्त्यांवरच सराव करत असे. त्याची क्षमता ओळखून संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमीच्या प्रशिक्षकांनी त्याला सेवा सहयोग फाउंडेशनच्या माध्यमातून अकॅडमीत प्रवेश मिळवून दिला.

येथे त्याला वैज्ञानिक प्रशिक्षण, योग्य तंत्र, पोषण मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध सराव मिळाला. पहिल्याच जिल्हास्तरीय स्पर्धेत त्याने ४०० मीटर धावणे आणि लांब उडीमध्ये प्रथम, तर गोळाफेकमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. गेल्या दोन वर्षांत त्याने तालुकास्तरावर ५ सुवर्ण व १ रौप्य, तसेच जिल्हास्तरावर २ सुवर्णपदके जिंकली. वर्षा मॅरेथॉन २०२५ मधील १० किमी शर्यतीत पाचवे स्थानही पटकावले. आज कृष्णाची यशोगाथा ग्रामीण युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि त्यासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा देत आहे.

अपयशातून यशाकडे : प्रज्वलची प्रेरणादायी भरारी

नवी मुंबईतील सानपाडा येथील सामान्य कुटुंबातील प्रज्वल बालू मिंढे याचा प्रवास जिद्द, शिस्त आणि चिकाटीचे प्रेरणादायी उदाहरण आहे. सेवा सहयोग फाउंडेशनच्या संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेताना त्याच्याकडे स्वतःचे धनुष्यही नव्हते. कठोर सराव, शारीरिक तंदुरुस्ती, योग्य तंत्र आणि मानसिक एकाग्रतेच्या प्रशिक्षणातून त्याने स्वतःला घडवले.

पहिल्याच स्पर्धेत अपेक्षित यश न मिळाल्याने खचून न जाता त्याने प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या चुका सुधारल्या. त्याच्या मेहनतीचे फळ २०२३ मध्ये जिल्हास्तरीय तिरंदाजी स्पर्धेतील कांस्यपदकाने मिळाले. त्यानंतर २०२३ ते २०२५ या कालावधीत राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये अनेक सुवर्ण व रौप्यपदके जिंकत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली. अलीकडेच त्याने डीएसओ तिरंदाजी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

सेवा सहयोग फाउंडेशनने दिलेली क्रीडा सामग्री, दर्जेदार प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन यांच्या बळावर प्रज्वल आज अनेक तरुणांसाठी मेहनत, शिस्त आणि आत्मविश्वासाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला आहे.





रोहिणी नामदेव मोडक हिचा प्रवास जिद्द, शिस्त आणि कठोर परिश्रमाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातून आलेल्या रोहिणीने २०१७ मध्ये इयत्ता आठवीत असताना कर्जत यथील संजय हेगडे स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. दररोज लांबचा प्रवास करूनही तिने वेटलिफ्टिंग आणि पॉवरलिफ्टिंगमधील सराव अखंड सुरू ठेवला.

जिद्दीतून घडलेले सामर्थ्य – रोहिणीची प्रेरणादायी वाटचाल

सेवा सहयोग फाउंडेशनचे मार्गदर्शन, तज्ज्ञ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर तिने जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि विद्यापीठस्तरीय स्पर्धांमध्ये trophies मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. २०२२ च्या राष्ट्रीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक, २०१८ च्या राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत रौप्यपदक, तसेच आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड ही तिच्या कारकिर्दीतील महत्त्वाची यशे आहेत.सेवा सहयोगचा पाठिंबा, प्रशिक्षणामुळे विविध स्पर्धांमधील मिळालेल्या संधी, अनेक मेडल्स आणि रोहिणीचे स्वतःचे कष्ट .....याच्या जोरावर २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून निवड होऊन तिचे स्वप्न पूर्ण झाले. रोहिणीची यशोगाथा सिद्ध करते की योग्य संधी, दर्जेदार प्रशिक्षण आणि अथक परिश्रम यांच्या बळावर ग्रामीण भागातील मुलीही राष्ट्रीय यश आणि उज्ज्वल करिअर घडवू शकतात.

किशोरी विकास प्रकल्प

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

किशोरवयीन मुलींमध्ये आत्मविश्वास, आरोग्यविषयक जनजागृती, नेतृत्वगुण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सुरक्षितता, स्वसंरक्षण कौशल्ये, जीवन कौशल्ये आणि सामाजिक सहभाग वाढवणे.

सुरुवात

या प्रकल्पाची सुरुवात **२०१९-२०** मध्ये ४ विभाग/झोन,
१८ किशोरी वर्ग आणि **४०१** मुलींसह झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२०१९-२०
पायाभरणी टप्पा (४ विभाग, १८ किशोरी वर्ग आणि ४०१ किशोरवयीन मुली).

२०२०-२१
कोविडच्या कठीण काळातही वर्ग सुरू (४ विभाग, १६ किशोरी वर्ग आणि ३०० मुली).

२०२१-२२
विस्तार (६ विभाग, ३८ किशोरी वर्ग आणि ७९७ मुली); 'किशोरी उत्सव' महोत्सवाचे यशस्वी आयोजन.

२०२२-२३
३९ किशोरी वर्ग आणि ८३५ मुली; उपक्रमांमध्ये नेतृत्व शिबिर, आरोग्य तपासणी, आरोग्य किट वाटप, पथनाट्य स्पर्धा आणि लाठी-काठी प्रशिक्षणाचा समावेश.

२०२३-२४
५६ किशोरी वर्ग आणि १,३४५ मुली; अभ्यास दौरे, कार्यपुस्तिका आणि नेतृत्व शिबिरांचा विस्तार.

२०२४-२५
७ विभाग, ७१ किशोरी वर्ग आणि १,४९६ मुली; पातळी-२ कार्यपुस्तिका, लाठी-काठी स्पर्धा आणि पोषण आहार मदतीची जोड.

२०२५-२६
१० विभाग, ११४ किशोरी वर्ग आणि २,४३९+ मुली; मूकबधिर मुलींसाठी विशेष वर्गाची सुरुवात.

२०२६-आतापर्यंत
अद्ययावत पोहोच: १२ विभाग, १२८ किशोरी वर्ग आणि ४,८३०+ किशोरवयीन मुली.

प्रमुख उपक्रम

किशोरी उत्सव
नेतृत्व शिबिर
शैक्षणिक सहली आणि अभ्यास दौरे
आरोग्य तपासणी
आरोग्य किट्सचे वाटप
पथनाट्य स्पर्धा
पातळी १ आणि २ मार्गदर्शिका पुस्तके
कार्यपुस्तिका
लाठी-काठी प्रशिक्षण आणि स्पर्धा
'तिच्यावर बोलू काही...'
पोषण आहार मदत
नेतृत्व प्रशिक्षण
मूकबधिर मुलींसाठी विशेष सत्रे
सेवा स्वास्थ्य उपक्रम - माहुल-चेंबूर

लाभार्थी व्याप्ती

विभाग/झोन | **२०१९-२० मधील ४ विभागांवरून २०२६-२७ मध्ये ११ विभागांपर्यंत वाढ.**

किशोरी वर्ग | **१८ वर्गांवरून ११४ वर्गांपर्यंत (२०२५-२६).**

किशोरी पोहोच | **४०१ मुलींवरून २,७७८ मुलींपर्यंत (२०२५-२६).**

सेवा स्वास्थ्य उपक्रम सुरुवात | **डिसेंबर २०२४ मध्ये माहुल-चेंबूर येथे.**

सेवा स्वास्थ्य पोहोच | **२५० मुली, २५० मुले आणि ४०० पालक. एकूण ९०० लाभार्थी.**

भविष्यातील वाटचाल


मुलींमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व, आरोग्य जनजागृती, स्वसंरक्षण आणि जीवन कौशल्ये अधिक बळकट करणे सुरूच राहील. सेवा स्वास्थ्यांतर्गत आगामी काळात मानसिक आरोग्य सत्रे, दंत तपासणी, त्वचेच्या समस्यांची तपासणी, नेतृत्व प्रशिक्षण आणि स्वच्छता पंधरवडा आयोजित करण्याचे नियोजन आहे.

स्वयंसेविका ते सहाय्यक व्यवस्थापक : पूनमचा प्रेरणादायी प्रवास

नेतृत्वाची सुरुवात पदापासून नव्हे, तर समाजासाठी काहीतरी करण्याच्या इच्छेपासून होते. पूनम घरत हिचा प्रवास याचे उत्तम उदाहरण आहे. २०१६ मध्ये अकरावीत शिकत असताना तिने आपल्या गावातील रविवार शाळेत स्वयंसेवक म्हणून लहान मुलांना शिकवण्यास सुरुवात केली. सेवा सहयोग फाउंडेशनच्या उपक्रमांशी जोडल्यावर तिने सफाळे अभ्यासिकेत दहावीच्या विद्यार्थ्यांना गणिताचे मार्गदर्शन केले आणि तिच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी १००% यश मिळवले.



२०१९ मध्ये ती दहिवले गावाची 'किशोरी प्रमुख' बनली. कोविड काळात तिने ऑनलाइन वर्ग सुरू करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अखंड सुरू ठेवले. ग्रामविकास उपक्रमांतर्गत तिने ५०० हून अधिक महिलांना ब्युटी केअर, शिवणकाम आणि उद्योजकता प्रशिक्षणाशी जोडले. एम.कॉम. आणि सामाजिक कार्यातील डिप्लोमा पूर्ण करत पूनमने समाजकार्याची वाटचाल सुरू ठेवली. आज ती किशोरी विकास प्रकल्पाची सहाय्यक व्यवस्थापक म्हणून पालघर व रायगड जिल्ह्यांतील कामकाजाचे नेतृत्व करत अनेक युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान बनली आहे



जागी झाली माझ्यातली वाघीण

मी अनुष्का वाघमारे. गेली चार वर्षे सेवा सहयोग फाउंडेशनच्या किशोरी विकास प्रकल्पाशी जोडलेली आहे. नेतृत्व शिबिरांमधील लाठी-काठी प्रशिक्षणाने माझ्यात आत्मविश्वास, धैर्य, प्रसंगावधान आणि स्वसंरक्षणाची क्षमता विकसित केली. नियमित सराव आणि प्रात्यक्षिकांमुळे संकटसमयी शांत राहून योग्य निर्णय घेण्याची ताकद मिळाली.

४ जुलै २०२६ रोजी रात्री मुंबईतून परतताना मी, माझी बहीण आणि एक मैत्रीण ऑटोरिक्षाने घाटकोपरकडे निघालो होतो. ऑटोचालक संशयास्पदरीत्या रिक्षा निर्जन रस्त्यावर घेऊन गेला आणि फोनवर वारंवार बोलू लागला. धोका ओळखताच मी धाडसाने त्याची कॉलर पकडून ठेवत, मोठ्या स्वरात त्याला यू-टर्न घेण्यास सांगितले. त्याचवेळी मैत्रिणींना मोबाईलवर लोकेशन सुरू करण्यास सांगितले आणि माझ्या नातेवाईकांना रिक्षाचा क्रमांक सांगितला. माझ्या ठाम भूमिकेमुळे घाबरून चालकाने लगेच दिशा बदलली आणि आम्ही सुरक्षितपणे घाटकोपर स्थानकात पोहोचलो.

त्या दिवशी मला जाणवले की धैर्य एका क्षणात निर्माण होत नाही; सातत्यपूर्ण प्रशिक्षणातून ते घडते. किशोरी विकास प्रकल्पाने माझ्यातील 'वाघीण' खऱ्या अर्थाने जागी केली.





सेवा सहयोग फाउंडेशनच्या किशोरी विकास प्रकल्पांतर्गत दरवर्षी १०० हून अधिक किशोरी गटांमध्ये सुमारे २,५०० मुलींना लाठी-काठी प्रशिक्षण दिले जाते. हा उपक्रम केवळ स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण नसून आत्मविश्वास, शिस्त, प्रसंगावधान आणि मानसिक धैर्य विकसित करणारा प्रभावी उपक्रम आहे.

हातात लाठी, मनात धैर्य

२०२४ मध्ये रायगड जिल्ह्यातील एका गावात प्रशिक्षण शिबिर सुरू होण्यापूर्वी अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटनेमुळे गांव ढवळून निघाला, पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पालक मुलीना घराबाहेर पाठवेनात, इथे कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. सेवा सहयोगच्या कार्यकर्त्यांनी पालकांशी संवाद साधून लाठी-काठी प्रशिक्षणाचे महत्त्व, त्यामुळे मिळणारे प्रसंगावधान, हिम्मत या सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. जवळजवळ रद्द झालेले शिबिर नियोजित वेळेत यशस्वीपणे पार पडले.

या आठ दिवसांच्या खास प्रशिक्षणातून मुलीं स्वसंरक्षणाबरोबरच संकटसमयी शांत राहणे, योग्य निर्णय घेणे आणि एकमेकींना आधार देणे शिकल्या. सहभागी वेदश्री पवार म्हणते, "या प्रशिक्षणामुळे माझ्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला आहे. गरज पडल्यास मी स्वतःचे संरक्षण करू शकते याचा विश्वास आला" आज या किशोरी निर्भयपणे अन्यायाविरुद्ध उभ्या राहत इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहेत.

सावरलेले आयुष्य गोपनीयतेच्या कारणास्तव नाव बदलले आहे.

सोनाली (बदललेले नाव), वय १५ वर्षे, ही २०२४ जिजाई किशोरी वर्ग, श्रीवर्धनतील किशोरी आहे. लहानपणापासूनच आईपासून दूर राहिल्यामुळे आणि वडील पक्षाघातामुळे अंथरुणाला खिळल्याने तिच्या आयुष्यात भावनिक आधाराचा अभाव होता. गेल्या काही महिन्यांपासून तिची आत्या तिची जबाबदारी सांभाळत होती. या परिस्थितीमुळे ती भावनिकदृष्ट्या असुरक्षित झाली होती.

याच काळात इन्स्टाग्रामवर एका मुलाने तिला मैत्रीची विनंती पाठवली. सातत्याने संवाद साधत त्याने तिच्याशी भावनिक जवळीक निर्माण केली आणि प्रेमसंबंधात गुंतवण्याचा प्रयत्न केला. भावनिक आधाराच्या शोधात असलेल्या सोनालीला या परिस्थितीतील धोका ओळखता आला नाही.

ही बाब समजल्यानंतर शाळा आणि कुटुंब सतर्क झाले. हे प्रकरण सेवा सहयोग फाउंडेशनच्या किशोरी विकास प्रकल्पातील जिजाई किशोरी वर्गाच्या किशोरी ताईपर्यंत पोहोचले.

ताईंनी अत्यंत संवेदनशीलतेने हे प्रकरण हाताळले. त्यांनी सोनाली, तिची आत्या, कुटुंबीय आणि शाळेतील शिक्षक यांचा विश्वास संपादन करून समुपदेशन केले. सातत्यपूर्ण संवाद आणि योग्य मार्गदर्शनामुळे सोनालीला त्या मुलाच्या प्रभावातून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले.

आज सोनाली पूर्वीपेक्षा अधिक आत्मविश्वासाने आयुष्याकडे पाहत आहे. किशोरी वर्गामार्फत तिचे भावनिक बळ वाढविण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे.

ही प्रेरणादायी गाथा किशोरवयीन मुलींसाठी डिजिटल सुरक्षितता, भावनिक समुपदेशन आणि योग्य वेळी केलेल्या हस्तक्षेपाचे महत्त्व अधोरेखित करते. योग्य मार्गदर्शन आणि संवेदनशील साथ मिळाल्यास अनेक मुलींचे आयुष्य सकारात्मक दिशेने बदलू शकते.



थॅलेसेमियामुक्त भारताकडे एक पाऊल : नजागृतीतून बदलाची वाटचाल

कधीकधी एक साधी रक्ततपासणी संपूर्ण कुटुंबाचे भविष्य बदलू शकते. किशोरी विकास प्रकल्पांतर्गत सेवा सहयोग फाउंडेशनने कर्जत , पालघर, शहापूर आणि मुंबई येथे ७१८ किशोरींची हिमोग्लोबिन व थॅलेसेमिया तपासणी केली. तपासणीत ग्रामीण भागातील ४६.५% आणि शहरी भागातील ४३% मुलींमध्ये अशक्तपणा आढळला, तर काहींमध्ये बीटा थॅलेसेमिया ट्रेट निदर्शनास आला.



वेळेत निदान झाल्यामुळे मुली व त्यांच्या कुटुंबांना समुपदेशन, वैद्यकीय मार्गदर्शन आणि प्रतिबंधात्मक आरोग्य नियोजनाची संधी मिळाली. ८ मे २०२६, जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त मुंबईत आयोजित परिसंवादात तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक, रक्तपेढी प्रतिनिधी, थॅलेसेमिया योद्धे आणि स्वयंसेवक सहभागी झाले. लवकर तपासणी, विवाहपूर्व समुपदेशन, प्रसूतीपूर्व निदान आणि रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. "पत्रिका जुळवण्यापूर्वी रक्त तपासणी जुळवा" हा प्रभावी संदेश देत हा उपक्रम थॅलेसेमियामुक्त भारताच्या दिशेने आशादायी पाऊल ठरला.

विद्यार्थी विकास योजना

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

शिषबद्ध निवड, कौटुंबिक आर्थिक पडताळणी, मार्गदर्शन आणि सामाजिक जबाबदारीच्या मूल्यांसह गरीब, गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्च शिक्षण घेण्यासाठी पाठिंबा देणे.

सुरुवात

विद्यार्थी विकास योजनेची सुरुवात २००८ मध्ये फक्त ५ विद्यार्थ्यांना पाठिंबा देऊन झाली.
टीजेएसबी सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र कर्वे
यांच्या वैयक्तिक वचनबद्धतेतून आणि काही विश्वासू मित्रांच्या सहकार्याने ही सुरुवात झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२००८
५ विद्यार्थ्यांसह उपक्रमाचा श्रीगणेशा.

२०२६ ते आतापर्यंत
तब्बल २,८९५ विद्यार्थी या योजनेचा थेट लाभ घेत आहेत.

प्रमुख उपक्रम

शैक्षणिक गुणवत्ता आणि गरजेनुसार विद्यार्थ्यांची पारदर्शक निवड.
महाराष्ट्रातील १२५+ पालक स्वयंसेवकांमार्फत विद्यार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट
विद्यार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे सखोल मूल्यमापन.
व्हीव्हीवाय (VVY) वेब पोर्टलवर मूल्यमापन अहवाल सादर करणे.
मुख्य समितीद्वारे पडताळणी आणि अंतिम मंजुरी.
व्यावसायिक उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक आणि आर्थिक सहाय्य.
नियमित मेंटॉरशिप (मार्गदर्शन).
विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे.

लाभार्थी व्याप्ती

लाभार्थी विद्यार्थी | **२,८७५ पेक्षा जास्त विद्यार्थी**

मदत मिळालेल्या शाळा | **८ शाळांना मदत**

नोकरी मिळालेले माजी विद्यार्थी | **६००+ माजी विद्यार्थी नामांकित संस्थांमध्ये कार्यरत**

पालक स्वयंसेवक | **१२५+ स्वयंसेवक कार्यरत**

महाराष्ट्रातील पोहोच | **२५ जिल्हे आणि २०७ तालुके**

मदत देण्याची पद्धत | **निवड, गृहभेटी, मूल्यमापन अहवाल, समितीची मंजुरी आणि नियमित मार्गदर्शन.**

भविष्यातील वाटचाल

हा प्रकल्प गरीब आणि गरजू गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, मेंटॉरशिप,
शैक्षणिक प्रोत्साहन आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेसह पाठिंबा देणे सुरूच ठेवेल.

स्वप्नपूर्ती

मी संचिता संतोष खडकर, रायगड जिल्ह्यातील माणगांवची रहिवासी. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्याने आईने अत्यंत हलाखीत आम्हा भावंडांना सांभाळले. दहावीत ९४% गुण मिळवून मी शाळेत पहिली आले आणि इंजिनिअरिंगसाठी मुंबईच्या 'व्ही.जे.टी.आय.' (VJTI) कॉलेजमध्ये माझा नंबर लागला. परंतु, आर्थिक चणचण आणि मुंबईतील राहण्याचा खर्च मोठा प्रश्न होता.त्याच वेळी मला सेवा सहयोग फाउंडेशनच्या 'विद्यार्थी विकास योजने'ची साथ मिळाली. संस्थेने माझी कॉलेज फी आणि हॉस्टेलचा सर्व खर्च उचलला. या भक्कम पाठिंब्यामुळेच मी माझे शिक्षण पूर्ण करू शकले. इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षी माझी 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' (TCS) मध्ये निवड झाली आणि माझे स्वप्न साकार झाले!



शिक्षणासोबतच चक्रीवादळ असो वा कोरोनाचा कठीण काळ, सेवा सहयोगने आमच्या कुटुंबाची नेहमीच आपुलकीने विचारपूस केली आणि धीर दिला.योग्य वेळी मिळालेली ही मदत म्हणजे माझ्या आईच्या कष्टांचे चीज आणि संपूर्ण कुटुंबाच्या प्रगतीचा आधार ठरली आहे. हे ऋणानुबंध मी आयुष्यभर जपेन!



भरारी

मी रेणुका श्रीराम पटवर्धन, सांगलीची रहिवासी. बाबा प्रायव्हेट इलेक्ट्रिशियन आणि आई गृहिणी; परिस्थिती रोज कमवून खाण्याची होती. दहावीत पहिली आल्यावर मी विलिंग्डन कॉलेजमधून B.Sc. पूर्ण केले.

इथपर्यंतचे शिक्षण स्कॉलरशिपवर झाले, पण उच्च शिक्षणासाठी पैसे नव्हते. अशा वेळी विद्यार्थी विकास योजनेमुळे माझ्या आयुष्याला परिसस्पर्श झाला. कर्वे सरांनी घरी येऊन परिस्थिती जाणून घेतली आणि २०१४ मध्ये सेवा सहयोगतर्फे मला पहिली मदत मिळाली. या आधारावर मी B.Sc. व M.Sc. (Physics) डिस्टिंक्शनमध्ये पूर्ण केले.

त्यानंतर Business Analytics मध्ये MBA करून टॉपर राहिले. आज मी 'Capgemini' कंपनीत Supply Chain Management मध्ये कार्यरत असून कुटुंबाचा भक्कम आर्थिक आधार बनले आहे. नुकतेच मी APICS CSCP हे महत्त्वाचे सर्टिफिकेशनही उत्तीर्ण केले.

अंधारातून चालताना सेवा सहयोग माझ्यासाठी आशेचा किरण ठरले. ही अमूल्य मदत मी आयुष्यात इतर गरजूंना देऊन हा वारसा पुढे चालवेन!

परमेश्वरी कार्याची प्रचीती

मी मानसी चतुर्वेदी, कल्याणची रहिवासी. पदवी शिक्षणानंतर एम.एससी. करायचे होते, पण वडिलांच्या अकस्मात निधनाने कुटुंबाची सर्व जबाबदारी माझ्यावर आली. मी कोचिंग क्लासमध्ये नोकरी सुरू केली, पण काही दिवसांतच आईला कॅन्सरचे निदान झाले आणि उच्च शिक्षणाचे माझे स्वप्न अधुरेच राहून गेले.

२०२० मध्ये मित्र व्यंकटेशमुळे मला सेवा सहयोग फाऊंडेशनच्या 'विद्यार्थी विकास योजने'ची माहिती मिळाली. रवींद्र कर्वे सरांनी माझी परिस्थिती समजून घेत लगेच मदतीचा हात दिला. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी झुनझुनवाला कॉलेजमधून एम.एससी. पूर्ण केले. एवढेच नाही, तर माझी धाकटी बहीण मुस्कान हिलादेखील कॉम्प्युटर सायन्सच्या शिक्षणासाठी संस्थेने मदत केली.

या मदतीच्या बळावर आज मला मुंबई IIT मध्ये 'सिनियर टेक्निकल प्रोजेक्ट असिस्टंट' म्हणून नोकरी मिळाली आहे.

विद्यार्थी विकास योजना आमच्या कुटुंबासाठी 'टर्निंग पॉइंट' ठरली. अडचणीत मिळालेल्या या आधाराची जाणीव ठेवून भविष्यात गरजूंना मदत करण्याची माझी इच्छा आहे.





स्वप्नपूर्ती

मी अक्षय पोपट वाळे, सोलापूरच्या एका शेतकरी कुटुंबातील मुलगा. घरची परिस्थिती बेताची असली तरी आई-वडिलांनी शिक्षणाला नेहमीच प्रोत्साहन दिले. २०२१ मध्ये पुण्यातील शेतकी महाविद्यालयातून B.Sc. Agriculture पूर्ण केल्यानंतर मी UPSC चा अभ्यास सुरू केला. अखंड मेहनतीचे फळ म्हणून 'इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसेस' (IFS) परीक्षेत मी भारतात १०० वा क्रमांक पटकावला!

माझ्या या यशात सेवा सहयोग फाउंडेशनच्या 'विद्यार्थी विकास योजने'चा खूप मोठा वाटा आहे. १२ वीत असताना मी संस्थेशी जोडलो गेलो. कार्यकर्त्यांनी पालकांप्रमाणे माझी काळजी घेतली, मार्गदर्शन केले आणि आवश्यक सर्व मदत पुरवली. विद्यार्थी विकास योजनेमुळेच माझ्यासारख्या शेतकरी कुटुंबातील मुलाचे सनदी अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले. संस्थेच्या या छत्रछायेबद्दल मी अत्यंत ऋणी असून, भविष्यात माझ्यासारख्या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी नक्की मदत करेन!

विज्ञान उपक्रम

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

पुस्तके, शैक्षणिक सहाय्य, प्रात्यक्षिक विज्ञान, STEM शिक्षण, फिरते शिक्षण आणि मुलांसाठी व तरुणांसाठी समुदाय-आधारित शिक्षण संधींचा विस्तार करणे.

सुरुवात

या प्रवासाची सुरुवात २०१७ मध्ये बुक बँक (Book Bank) आणि कम्युनिटी नॉलेज सेंटर उपक्रमांनी झाली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम

२०१७
बुक बँक आणि कम्युनिटी नॉलेज सेंटर सुरू झाले.

२०१८
'नॉलेज ऑन व्हील्स' (Knowledge on Wheels - फिरती शाळा) प्रकल्पाची सुरुवात.

२०२२
प्रयोगाधारित 'स्टेम' (STEM) शिक्षणाची सुरुवात.

२०२३
'सुपर ६०' (Super 60), गिरगाव अभ्यासिका आणि 'विज्ञासा' (Vigyasa) उपक्रमांची सुरुवात.

२०२४
पश्चिम मुंबईतील शाळांमध्ये 'ज्ञानदीप महिंद्रा' (Gyandeep Mahindra) प्रकल्पाची यशस्वी सुरुवात.

प्रमुख उपक्रम

बुक बँक
कम्युनिटी नॉलेज सेंटर
नॉलेज ऑन व्हील्स
ज्ञानदीप महिंद्रा सुपर ६०
गिरगाव अभ्यासिका
विज्ञासा
स्टेम (STEM) शिक्षण आणि हस्तप्रयोग साधने
प्रात्यक्षिक विज्ञान आणि प्रयोगाधारित शिक्षण
शैक्षणिक सहाय्य आणि फिरते शैक्षणिक वर्ग

लाभार्थी व्याप्ती

प्रमुख उपक्रम | **८**

बुक बँक | **११,७५३ लाभार्थी**

कम्युनिटी नॉलेज सेंटर | **४५,०४५ लाभार्थी**

नॉलेज ऑन व्हील्स | **३८,५०२ लाभार्थी; ८ फिरत्या वाहनांद्वारे ८ क्षेत्रांमध्ये विस्तार**

ज्ञानदीप महिंद्रा | **६,९४९ लाभार्थी; पश्चिम मुंबईतील १२ शाळांमध्ये विस्तार**

ज्ञानदीप सुपर ६० | **९४० लाभार्थी**

गिरगाव अभ्यासिका | **८००+ विद्यार्थी**

विज्ञासा (Vigyasa) | **९,६२३ विद्यार्थी; १९ शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळांची उभारणी**

स्टेम (STEM) | **देशातील ४०३ शाळांमधील १,३७,३३५ विद्यार्थी**

भविष्यातील वाटचाल

हा उपक्रम शिक्षणाची सुलभता वाढवणे, प्रात्यक्षिक विज्ञान, प्रयोगाधारित STEM शिक्षण, शैक्षणिक सहाय्य आणि मोबाईल आउटरीचच्या माध्यमातून मुलांना अधिक चांगल्या संधी देणे सुरूच ठेवेल.



घाटकोपर (पश्चिम) येथील सनग्रेस इंग्लिश हायस्कूलमध्ये सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळेचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांचे विज्ञान शिक्षण मुख्यतः पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित होते. ही गरज ओळखून सेवा सहयोग फाउंडेशन आणि अलाईव्हस लाइफ सायन्सेस यांच्या सहकार्याने प्रोजेक्ट अंतर्गत आधुनिक विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यात आली. आवश्यक प्रयोगसाहित्य, शिक्षक प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, विश्लेषण क्षमता, जिज्ञासा, संशोधनाची आवड, संघभावना आणि समस्या सोडविण्याची कौशल्ये विकसित झाली. शिक्षकांनाही प्रयोगांच्या माध्यमातून संकल्पना अधिक प्रभावीपणे शिकविणे शक्य झाले. विज्ञान हा अवघड विषय न राहता आनंददायी आणि अनुभवाधारित बनला.

प्रोजेक्ट (विग्यासा) : प्रयोगाधारित विज्ञान शिक्षणाची नवी दिशा

या आत्मविश्वासाच्या बळावर विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा, विज्ञान प्रदर्शने आणि विविध विज्ञान स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले. नेहरू विज्ञान केंद्राच्या शैक्षणिक भेटीने त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला अधिक बळ मिळाले. हा उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षण पोहोचविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरला.

- सौ. कुसुम यादव, सनग्रेस इंग्लिश हायस्कूल, घाटकोपर (पश्चिम)



यशाची झेप

नवी मुंबईतील के.ई.एस. इंदुबाई वाजेकर इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी आर्या विनोद नाईक हिने प्रतिष्ठित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत रौप्यपदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तिचे यश हे जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध तयारीचे फलित आहे.

V J T I चे निवृत्त प्राध्यापक श्री. रवींद्र अरडक यांच्या मार्गदर्शनाखाली ३८ तासांचे २५ प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. या सत्रांमुळे वैज्ञानिक संकल्पना, प्रयोग, विश्लेषणात्मक विचार आणि परीक्षेची तयारी अधिक सक्षम झाली. चार सराव परीक्षांमुळे वेळेचे नियोजन, प्रश्न सोडविण्याचे कौशल्य आणि आत्मविश्वास वाढला.

BARC निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. रवीकांत अळतेकर यांच्या विशेष मार्गदर्शनामुळे आर्याची वैज्ञानिक जिज्ञासा, तार्किक विचारशक्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता अधिक विकसित झाली. नियमित स्व-अभ्यास, सातत्यपूर्ण उजळणी तसेच पालक व शिक्षकांच्या पाठिंब्यामुळे तिने हे यश मिळवले. तिची कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.



घराचे आकारमान लहान असले तरी स्वप्नांना मर्यादा नसतात. श्री मंगुभाई दत्तानी विद्यालय, बोरिवली (पूर्व) येथील साहिल श्याम पाखलिले याची यशोगाथा याचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

छोटी खोली, मोठी स्वप्ने



अवघ्या ५ × १० फूटांच्या छोट्या घरात वाढलेल्या साहिलला आर्थिक अडचणींमुळे खासगी शिकवणी घेता आली नाही. गणित आणि विज्ञान हे विषय त्याच्यासाठी आव्हानात्मक होते. मात्र महिंद्रा अँड महिंद्रा आणि सेवा सहयोग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ज्ञानदीप महिंद्रा सुपर ६० प्रकल्पामुळे त्याच्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली. पूरक अध्यापन, प्रत्यक्ष विज्ञान प्रयोग आणि स्मार्टबोर्डद्वारे डिजिटल शिक्षण यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला.

वैयक्तिक मार्गदर्शन, नियमित सराव आणि सोप्या अध्यापन पद्धतीमुळे गणित हा त्याचा आवडता विषय बनला आणि त्याने गणितात ९७ गुण मिळवले. विज्ञानाची समजही अधिक दृढ झाली. अथक परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर त्याने एसएससी परीक्षा २०२५–२६ मध्ये ९१.२०% गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याची कहाणी प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे.

स्वयंअभ्यास, शिस्त आणि जिद्दीचा विजय



सेवा सहयोग फाउंडेशनच्या गिरगाव अभ्यासिका केंद्रात अभ्यास करणाऱ्या टीना राठोड हिने परदेशी वैद्यकीय पदवीधरांसाठीची एफएमजीई (Foreign Medical Graduate Examination) परीक्षा उत्तीर्ण करून जिद्द, शिस्त आणि स्वअभ्यासाचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

तयारीच्या सुरुवातीपासूनच टीनाने नियमित उपस्थिती, नियोजनबद्ध अभ्यास, सातत्यपूर्ण उजळणी आणि स्वअभ्यास यांना प्राधान्य दिले. स्वतःचे अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून तिने कठीण विषयांवर विशेष मेहनत घेतली. विशाल अभ्यासक्रम आणि परीक्षेच्या ताणावर संयम, आत्मविश्वास आणि चिकाटीच्या बळावर तिने यशस्वीपणे मात केली.

गिरगाव अभ्यासिका केंद्राने तिला शांत, सुरक्षित आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून दिले. सेवा सहयोग फाउंडेशनच्या प्रोत्साहनामुळे तिचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला. योग्य वेळेचे नियोजन, सातत्यपूर्ण सराव आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर तिने एफएमजीई परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. तिचे यश प्रत्येक वैद्यकीय पदवीधरासाठी प्रेरणादायी असून, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हे सिद्ध करते.

संधी मिळाली, स्वप्नांना नवी भरारी : एनएमएमएस यशोगाथा

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असूनही आर्थिक अडचणी, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि स्पर्धा परीक्षांची भीती यामुळे त्यांची स्वप्ने अपुरी राहतात. ही गरज ओळखून सेवा सहयोग फाउंडेशनच्या कम्युनिटी नॉलेज सेंटरने सन २०२५-२६ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) मार्गदर्शन उपक्रम राबविला.

या उपक्रमात ग्रामीण महाराष्ट्रातील ४ शाळांतील २३४ विद्यार्थ्यांना SAT-MAT प्रशिक्षण, सराव परीक्षा, शंका निरसन, वैयक्तिक मार्गदर्शन आणि प्रेरणादायी सत्रे देण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून १५५ विद्यार्थी (६६%) पात्र ठरले, त्यापैकी ४० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली, तर ५३ विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आवश्यक पाठ्यपुस्तके देण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, स्पर्धा परीक्षांची भीती कमी झाली आणि मोठी स्वप्ने पाहण्याचे धैर्य मिळाले. योग्य संधी, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सक्षम मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण विद्यार्थीही उल्लेखनीय यश संपादन करू शकतात, हे या उपक्रमाने सिद्ध केले.



शिक्षणाच्या बळावर यशाकडे वाटचाल



भाईंदर येथील प्रविण पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारी श्रावणी राजाराम बडबे ही जिद्दी विद्यार्थिनी आहे. तिचे वडील ऑटो-रिक्षा चालक असून कुटुंबाच्या मर्यादित उत्पन्नामुळे अभियांत्रिकीची महागडी पुस्तके खरेदी करणे शक्य नव्हते.

ही गरज ओळखून सेवा सहयोग फाउंडेशनच्या 'संकल्प बुक बँक' उपक्रमांतर्गत तिला २०२३-२४ पासून आवश्यक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे तिच्या कुटुंबावरील आर्थिक भार कमी झाला आणि ती अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकली.

तिची शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय आहे. तिने पहिल्या सत्रात ७३.३३% (८.०० SGPI), दुसऱ्या सत्रात ८०.००% (९.०५ SGPI), तिसऱ्या सत्रात ८०.१३% (९.०४ SGPI) आणि चौथ्या सत्रात ८९.४२% (१०.०० SGPI) गुण मिळवले. पाचवे सत्र यशस्वीरीत्या पूर्ण करून ती आता सहाव्या सत्राची तयारी करत आहे. श्रावणीचा प्रवास सिद्ध करतो की योग्य वेळी मिळालेले शैक्षणिक साहाय्य, जिद्द आणि सातत्य यांमुळे आर्थिक अडचणींवर मात करून मोठे यश मिळवता येते.

स्वयंसेवक सहभाग

explore our project journey

प्रकल्पाचं उद्दिष्ट

विविध क्षेत्रांतील स्वयंसेवक आणि भागीदार संस्थांना एकत्र आणणे, ज्याद्वारे समाजोपयोगी कार्यात शिकण्याची, योगदान देण्याची, सहकार्य करण्याची आणि सकारात्मक बदल घडवण्याची संधी निर्माण होईल.

सुरुवात

स्वयंसेवा हा सेवा सहयोग फाउंडेशनचा आत्मा आहे. २००७ मध्ये अवघ्या १५ मित्रांच्या समूहाने सुरू झालेल्या या उपक्रमात आज ३१,२२० पेक्षा जास्त स्वयंसेवक जोडले गेले आहेत. समाजाचे देणे फेडण्याच्या निस्वार्थ भावनेने २००९ मध्ये सेवा सहयोग फाउंडेशनची अधिकृत स्वयंसेवी संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली.

प्रकल्पाचा प्रवास / कालक्रम (सौर ऊर्जा प्रकल्प)

२००७
१५ स्वयंसेवक

२०१७-१८
४,०००+ स्वयंसेवक

२०२२-२३
१०,२४९ स्वयंसेवक

२०२४-२५
२९,०५४ स्वयंसेवक

आतापर्यंत
३१,२२०+ स्वयंसेवक

प्रमुख उपक्रम

पर्यावरण आणि शाश्वतता मोहीम : बियाणे संकलन (seed sowing), सीडबॉल निर्मिती (seedball making), वृक्षारोपण, पक्ष्यांसाठी अन्नपात्रांची निर्मिती, समुद्रकिनारा/नदी/उद्यान स्वच्छता, सौर दिव्यांची जुळवणी (solar lamp assembly).

कला आणि हस्तकला (Craftsmanship): कागदी पिशव्यांची निर्मिती, रेड डॉट पिशव्यांची निर्मिती, भिंत चित्रकला (wall painting), दगड/पणती/गल्ला रंगवणे, सण-उत्सवांचे भेटवस्तू वाटप.

परस्परसंवादी शिक्षण (Interactive Learning): स्कूल किट असेंब्ली, स्टेम (STEM) आणि हस्तप्रयोग साधने, शैक्षणिक तक्ते आणि कोडी बनवणे, स्टोरी क्यूब (story cube), मॅथ्स व्हील (maths wheel), इलेक्ट्रॉनिक करिअर मार्गदर्शन, विज्ञान दिन साजरा करणे.

अनुभवात्मक शिक्षण (Experiential): वंचित शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दौरे आणि सहली.

लाभार्थी व्याप्ती

सहभागी स्वयंसेवक | **३१,२२०+**

भागीदार कंपन्या | **२५+**

पसरलेली राज्ये | **१०**

विविध उपक्रम | **२६**

प्रमुख क्षेत्रे | **पर्यावरण आणि शाश्वतता, अनुभवात्मक शिक्षण, हस्तकला.**

भविष्यातील वाटचाल

स्वयंसेवक सहभाग व्यक्तींना सामाजिक कार्यांशी जोडणे, सातत्यपूर्ण स्वयंसेवेद्वारे समुदाय बळकट करणे आणि सामूहिक सहभागाची संस्कृती रुजवणे सुरूच ठेवेल.

सेवा सहयोगासोबतचा माझा प्रवास



२००७ मधील सेवा सहयोगच्या स्थापनेपासून संस्थापक संचालक कै. संजय हेगडे यांची पत्नी म्हणून मी या परिवाराचा एक भाग आहे.

स्कूल किट उपक्रमापासून सुरुवात करून जव्हार, मोखाडा, सफाळे या दुर्गम भागांत काम करताना समाजाच्या खऱ्या गरजा अनुभवल्या. संजय यांच्या संकल्पनेतून बोईसरचे कौशल्य विकास केंद्र आणि 'संजय हेगडे क्रीडा अकादमी' आकारास आली.

कोविड-१९ च्या भीषण संकटात जेव्हा सगळे घरात होते, तेव्हा आमच्या टीमने रुग्णांसाठी अहोरात्र धावपळ केली. मी डॉक्टर असल्याने रुग्णालयांच्या गरजा ओळखून निधी उभारणी केली आणि पीपीई किट, ऑक्सिजन उपकरणे व अत्यावश्यक औषधे वेळेत पुरवून पारदर्शक काम केले.

आज किशोरी विकास, क्रीडा विकास व सेवास्वास्थ्याद्वारे मुलांमुलींमधील आत्मविश्वास पाहताना संजय यांचे "माणसाने माणसासाठी जगले पाहिजे" हे शब्द आठवतात. हीच मूल्ये जपत ही सेवा-वाटचाल पुढे नेणे हेच माझे ध्येय आहे.

-डॉ. अस्मिता हेगडे
भूलतज्ज्ञ(Anesthetist),
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य,
किशोरी विकास, सेवास्वास्थ्य व क्रीडा विकास

सेवा सहयोगसोबत पाच वर्षे: अनुपमेय!

सेवा सहयोगशी गेली पाच वर्षे जोडले जाणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मौल्यवान अनुभव आहे. कार्यकारी समिती आणि प्रकल्प कार्यकारी समितीचा सदस्य म्हणून मी माझ्या व्यावसायिक आयुष्यातून मिळालेला धोरण आखणी, संस्थात्मक विकास, प्रक्रिया सुधारणा आणि नेतृत्वाचा अनुभव संस्थेला देण्याचा छोटासा प्रयत्न केला.

पण खरी गोष्ट अशी आहे की देण्यापेक्षा मी इथून जास्त शिकलो.

इथल्या कार्यकर्त्यांनी मला "सेवा" या शब्दाचा खरा अर्थ शिकवला. मोठ्या पगाराच्या संधी सोडून, घर-दाराची सोय न पाहता, समाजासाठी काहीतरी करायचे या एका ध्यासाने जगणारी माणसे, कार्यकर्ते मी इथे पाहिले. गरजूंचे दुःख स्वतःचे समजून रात्रंदिवस झटणारी, आणि तरीही चेहऱ्यावर समाधान ठेवणारी ही नि:स्वार्थी माणसे पाहिल्यावर मन अभिमानाने भरून येते.

माझ्या करिअरचा मोठा भाग मी बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये घालवला. तिथे यश, टार्गेट, नफा ही भाषा कायम असते. पण सेवा सहयोगमध्ये आल्यावर मला सचोटी, उद्देश आणि निस्वार्थ आणि सेवेची भाषा कळली. इथे प्रत्येक निर्णयामागे झोकून काम करणारा कार्यकर्ता आहे, प्रत्येक आकड्यामागे एक आयुष्य आहे.

आज मागे वळून पाहतो तेव्हा वाटते, मी संस्थेला काय दिले यापेक्षा संस्थेने मला कितीतरी जास्त दिले. एक नवी दृष्टी, एक नवा हेतू आणि माणुसकीवरचा नव्याने जागा झालेला विश्वास,!

मला वाटते, या प्रवासात मीच "निव्वळ घेणारा" आहे, आणि त्यासाठी मी मनापासून कृतज्ञ आहे.



-रवींद मिठे
व्यवस्थापन सल्लागार,
कार्यकारी समिती सदस्य, मुंबई,
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य, ग्राम विकास,
किशोरी विकास

सहयोगाची भावना...



समाजातील 'आहे रे' (haves) आणि 'नाही रे' (have not) या दोन परस्पर विरुद्ध टोकांवर असलेल्या समूहातील दरी बुजवणारा 'सेवा सहयोग' हा एक विश्वासार्ह दुवा तयार झाला आहे.

अमरकोशात 'सेवा' शब्दाचा अर्थ आहे, दुसर्यांच्या हित किंवा सुविधेसाठी एखादी व्यक्ती किंवा समुहाद्वारे केले जाणारे काम. आणि त्याच अमरकोशानुसार सहयोग म्हणजे, एकाहून अधिक लोकांनी एकत्र येऊन मिळून एखादे काम करण्याची क्रिया किंवा भाव.सेवा सहयोग म्हणजे, सेवा कशी? तर सहयोग वृत्तीने. आणि सहयोग कसा? तर सेवावृत्तीने. दोन्ही एकत्र हातात हात घालून!

व्याकरणाच्या दृष्टीने याचा उपसर्ग, प्रत्यय, विशेषण असा शब्दछल करून अधिक किस काढला जाऊ शकतो परंतु या शब्दांना खरा अर्थ कृतीतून देणारे कार्यकर्ते हे सेवासहयोगचे वैशिष्ट्य आहे. सहृद कार्यकर्ते हेच सेवा सहयोगचे बलस्थान आहे. योग्य नियोजन आणि त्याचे समर्पित वृत्तीने क्रियांवयन हे सेवा सहयोगच्या यशाचे गमक आहे. हे गेल्या सात-आठ वर्षात सेवा सहयोग बरोबर केलेल्या कामात माझ्या निदर्शनास आले आहे.

-जयंत जोशी
शास्त्रज्ञ BARC,
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य, विज्ञान व तंत्रज्ञान

तमसो मा ज्योतिर्गमय...

२०१६ पासून 'सेवा सहयोग' च्या कर्जत विभागात शैक्षणिक उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि ग्रामविकासाच्या कार्यातून कामाची ओळख निर्माण झाली. क्रीडा विकासाच्या संदर्भात आलेल्या किशोरजी, रमेशजी आणि संजयजी हेगडे यांच्याशी अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेत ओळख झाली. २०२० मध्ये निवृत्त झाल्यानंतर मी या कार्यात अधिक सक्रिय झालो.

आज मी किशोरी विकास, समुत्कर्ष अभ्यासिका, स्कूलकिट, पर्यावरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि शाळांसाठी सोलर सिस्टीम यांसारख्या अनेक उपक्रमांमध्ये कार्यरत आहे.अनेक समर्पित कार्यकर्ते व स्वयंसेवकांमुळे कर्जत विभागाचा विस्तार झाला असून, हे कार्य अधिक मजबूत व कौटुंबिक बनले आहे. हा संपूर्ण प्रवास मला एक "आनंददायी" अनुभव देणारा ठरला आहे.

॥ सेवा है यज्ञकुंड, समिधासम हम जले ॥



-नंदकुमार मणेर
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य, समुत्कर्ष

आनंददायी सेवेची ७ वर्षे



गेल्या सात वर्षांपासून मी सेवा सहयोगचा स्वयंसेवक म्हणून कार्य करत आहे. वंचित कुटुंबांतील मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी काम करण्याचा हा माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आणि समाधानकारक प्रवास आहे. सेवा सहयोग शालेय साहित्य, पुस्तके, शिक्षणासाठी आवश्यक वस्तू आणि इतर मदत पुरवून गरजू मुलांच्या शिक्षणासाठी उत्कृष्ट कार्य करत आहे. त्यांच्या प्रामाणिकपणा, समर्पण आणि सेवाभावामुळे हजारो मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत. या उदात्त कार्याचा छोटासा भाग असल्याचा मला अभिमान वाटतो. प्रत्येक मुलाला शिकण्याची आणि प्रगती करण्याची संधी मिळाली पाहिजे, आणि सेवा सहयोग हे स्वप्न साकार करण्यासाठी मोलाचे कार्य करत आहे. भविष्यातही मी या कार्यात माझे योगदान देत राहीन.

-सुधीर पै
HR Consultant, ISR Donor, स्वयंसेवक

सेवेचा आनंद: माझ्या जीवनाचा बदललेला प्रवास

सेवा सहयोगशी जोडले जाणे हे मी माझे भाग्य मानतो. हा केवळ उपक्रम नसून एक 'सत्संग' आहे, जिथे भेटणाऱ्या माणसांच्या सचोटी आणि प्रामाणिकपणामुळे माझा व्यक्तिमत्त्व विकास झाला. माझ्या स्वभावातील सकारात्मक बदल आणि चेहऱ्यावरील प्रसन्नता ही या सेवेच्या आनंदाचीच पावती आहे.

एकट्याने एवढे मोठे कार्य करणे शक्य नव्हते, पण 'सेवा सहयोग' नावाच्या इंजिनाशी जोडल्या गेल्याने माझा प्रवास अधिक अर्थपूर्ण बनला. इथे मला संघभावना, आत्मविश्वास आणि शारीरिक-मानसिकदृष्ट्या सक्षम होणे शिकायला मिळाले. श्रीरामांच्या कार्यात खारूताईने दिलेला वाटा, तशीच छोटीशी सेवा करण्याची संधी मला इथे मिळाली. सेवा हेच माझ्या जीवनाचे ध्येय असून यापुढेही ही संधी मिळत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

-अनामिक स्वयंसेवक, २००९ पासून



एक हात मदतीचा, हजारो आयुष्य बदलू शकतो

सेवा सहयोग फाउंडेशन आयोजित समुत्कर्ष अभ्यासिका प्रकल्पअंतर्गत मुंबईतील वस्तीतील समाजाच्या अगदी शेवटचा घटक असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका चालवल्या जातात. या अभ्यासिका वर्गात मी सौ. प्रतिभा नंदन वर्तक गेली पाच वर्षे व्हॉलेंटियर म्हणून काम करते. निवृत्त मुख्याध्यापिका असल्याने विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. आदिवासी भागात काम केल्याचा अनुभव इथे खूप उपयोगी पडला. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांच्या डोळ्यातील जिद्द पाहून मला नवीन ऊर्जा मिळते. या मुलांना घडवताना मला खरे समाधान मिळते. समाजासाठी काहीतरी देण्याचा आनंद या कामातून अनुभवते.

“सेवेतून खरे समाधान, सहभागी व्हा या यज्ञात!”

-प्रतिभा वर्तक
निवृत्त मुख्याध्यापिका,
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य, समुत्कर्ष



सेवा आणि थेट प्रभावावर आधारित नाते

सुमारे ८ ते १० वर्षांपूर्वी मुंबई मॅरेथॉनच्या देणगीनिमित्ताने सेवा सहयोग संस्थेशी परिचय झाला आणि तिचे कार्य पाहून मी कधी जोडला गेलो, समजलेच नाही.

अभ्यासिका, स्कूलकिट, किशोरी विकास, फिरत्या प्रयोगशाळा व विद्याश्रय यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजातील शेवटच्या घटकाचे प्रश्न सोडवणे, हे या संस्थेचे खास वैशिष्ट्य आहे. समित्यांचे उत्तम संयोजन आणि व्यवस्थापनामुळे कुठेही गोंधळ दिसत नाही. विशेष म्हणजे, कालचे लाभार्थी आज संस्थेत कार्यकर्ते म्हणून योगदान देत आहेत!या पारदर्शक व समर्पित कार्याशी तन, मन आणि धनाने जोडलेले राहणे माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. संस्थेच्या सर्व उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा!

-किरण देशमुख
उद्योजक, ISR Donor,
प्रकल्प कार्यकारिणी विशेष निमंत्रित, समुत्कर्ष



सेवा सहयोग फाऊंडेशनसोबतचा आमचा ८ वर्षांचा सार्थक प्रवास

२०१८ मध्ये माझे पती श्रीराम नाखरे आणि मी स्नेहा नाखरे, यांनी आईच्या स्मरणार्थ शैक्षणिक कार्यात मदत करण्याचे ठरवले. 'सेवा सहयोग'च्या 'विद्यार्थी विकास योजने'विषयी समजताच ठाण्यातील कार्यक्रमाला उपस्थित राहून आम्ही संस्थेशी जोडले गेलो.

आज श्रीराम विद्यार्थी विकास योजना, पश्चिम विभागाचे मार्गदर्शक म्हणून ३०० हून अधिक इंजिनिअरिंग, MBBS व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. मी ‘समुत्कर्ष अभ्यासिका’ प्रकल्पात स्वयंसेवक म्हणून कार्यरत आहे.

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या या महान कार्यात सहभागी होऊन योगदान देणे, हेच आमच्यासाठी खरे समाधान आहे!

-स्नेहा नाखरे
निवृत्त बँक व्यवस्थापक,
सदस्य, PEC, समुत्कर्ष

सेवा सहयोग फाउंडेशनसोबतचा प्रेरणादायी प्रवास

सन २०१७ पासून सेवा सहयोग फाउंडेशनसोबतचा माझा प्रवास हा माझ्या आयुष्यातील सर्वात समृद्ध करणारा ठरला आहे. शिक्षक म्हणून काम करत असताना या व्यासपीठामुळे समाजातील गरजूंपर्यंत पोहोचून त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची संधी मला मिळाली.



धाराशिव जिल्ह्यातील शैक्षणिक उपक्रम

या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना स्कूल किट, शिष्यवृत्ती, मुलींना सायकली, संगणक लॅब, स्मार्ट टी.व्ही., सोलर पॅनल, ग्रंथालय आणि स्वच्छतागृह दुरुस्ती अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. भूम, परंडा आणि कळंब येथील सायकल वाटप कार्यक्रमांत जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत व्यासपीठ मिळणे हा माझ्यासाठी अविस्मरणीय सन्मान होता.

पूररहात कार्य व विश्वासाची कसोटी

सप्टेंबर २०२५ मधील पूरपरिस्थितीत हजारो कुटुंबांना धान्य, कपडे व हायजिन किट पोहोचवले. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी ₹१०.५० लाखांची देयके बाकी असताना, संस्थेवरील अढळ विश्वासापोटी मी स्वतःचे ₹१०.५० लाखांचे धनादेश देऊन धान्य ताब्यात घेतले आणि वेळेत मदत पोहोचवली.

कौटुंबिक सहभाग व नैतिक मूल्ये

पूरग्रस्तांसाठी आलेल्या मदत साहित्यामुळे घर गोदाम बनले असताना पत्नी सोनाली, मुलगा विराज आणि सहकाऱ्यांनी निस्वार्थ साथ दिली. "जे ज्यांच्यासाठी आले आहे, ते त्यांच्यापर्यंतच पोहोचले पाहिजे" हे तत्त्व तंतोतंत पाळत हजारो साहित्यातून एक पेन्सिलही कुठल्याही कार्यकर्त्याच्या घरच्यांसाठी वापरली गेली नाही.

गरजूंच्या डोळ्यांतील आनंद आणि समाजाचा विश्वास हीच माझी खरी कमाई आहे. सेवा सहयोगने मला एक संवेदनशील व जबाबदार माणूस म्हणून घडवले, याचा मला सार्थ अभिमान आहे.

-विनोद सुरवसे
धाराशिव शिक्षक,
जिल्हा परिषद शाळा, पवारनगर,
परांडा, प्रकल्प कार्यकारिणी सदस्य,
शिक्षा विकास प्रकल्प

रिपल इफेक्ट: एका मदतीने घडवली आयुष्यभराची सेवा

मी डॉ. ओंकार स्नेहल सुरेश भालेकर. मी सध्या मुंबईतील केईएम (K E M) हॉस्पिटलमध्ये ऑक्युपेशनल थेरपीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. १२ वी नंतर कठीण आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सुरू ठेवणे अशक्य वाटत होते. त्यावेळी विद्यार्थी विकास योजनेच्या माध्यमातून सेवा सहयोग फाउंडेशनने केवळ माझ्या शिक्षणालाच नव्हे, तर माझ्या स्वप्नांनाही बळ दिले. गेल्या ७ वर्षांपासून मी त्यांच्या भांडुप अभ्यास केंद्रात स्वयंसेवा करत आहे. मी शिकवलेले अनेक विद्यार्थी आज उच्च शिक्षण घेत आहेत आणि स्वावलंबी जीवन जगत आहेत. त्यांचा हा प्रवास मला सातत्याने पुढे जाण्याची प्रेरणा देतो. आज मी माझ्या व्यवसायाच्या माध्यमातून समाजाची सेवा करत आहे. मला मिळालेल्या संधीची परतफेड करणे हीच माझी खरी कृतज्ञता आहे.



— डॉ. ओंकार स्नेहल सुरेश भालेकर,
ऑक्युपेशनल थेरपी पदव्युत्तर पदवी
(Masters in Occupational Therapy),
स्वयंसेवक - समुत्कर्ष,
मार्गदर्शक - विद्यार्थी विकास योजना

सेवा ही साधना... सहयोग ही शक्ती.

सेवा सहयोगसोबतचा माझा प्रवास हा केवळ स्वयंसेवेचा नाही, तर माणसं, भावना आणि स्वप्नं जोडण्याचा प्रवास आहे.किशोरी विकास उपक्रमातील किशोरींच्या डोळ्यांत उमलणारा आत्मविश्वास आणि "मीही काहीतरी करू शकते" ही भावना मला प्रत्येक वेळी प्रेरणा देते. समुत्कर्ष अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांसोबत वावरताना मी माझंच हरवलेलं बालपण पुन्हा अनुभवते. त्यांच्या निरागस हास्यात माझाही आनंद सामावलेला असतो. स्कूल किट एखाद्या मुलाच्या हातात देताना त्याच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद म्हणजे नव्या स्वप्नांची सुरुवात असते.

या प्रवासाने मला शिकवलं की, सेवा म्हणजे केवळ मदत नाही, तर संवेदना जपणं आणि माणसं जोडणं. सेवा सहयोगने मला समाजाकडे नव्या दृष्टीने पहायला शिकवलं आणि प्रत्येक छोट्या कृतीतूनही मोठा बदल घडू शकतो, यावरील माझा विश्वास अधिक दृढ केला.या परिवाराचा एक भाग होण्याचं मला सौभाग्य लाभलं, याबद्दल मी मनापासून ऋणी आहे.



-वर्षा संतोष परब
Partner of M/s. V MHS Hospital LLP,
M/s. Arjan Enterprises LLP,
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य, समुत्कर्ष, किशोरी विकास,
Saturday Seva समिती सदस्य

प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या.



मी रवींद्र जोशी, मूळचा सातारकर आणि सध्या ठाणेकर. ४० वर्षे ॲडमिन व पर्चेस विभागात काम करून २०२० मध्ये निवृत्त झालो. पण स्वस्थ बसणे जमले नाही, म्हणून गेली ५+ वर्षे 'सेवा सहयोग' मध्ये स्वयंसेवक म्हणून योगदान देत आहे.

रोज ४ तास ठाणे कार्यालयात "जिथे कमी तिथे आम्ही" या भावनेने दप्तर व हेल्मेट वाटप, सोलर लॅम्प, मॅथ्स व्हील आणि पर्चेस ऑर्डर ते सप्लायर फॉलो-अपपर्यंतची सर्व कामे करतो. इथे सर्वांकडून मिळणारा "रवीजी" हा आदर मला नेहमी उत्साही ठेवतो.

अमेरिकेत मुलाकडे गेलो तरी तिथूनही पर्चेसचे काम सुरूच असते. समाजसेवा करत राहणे हेच माझे ध्येय आहे, कारण 'Age is just a number!'

-रविंद्र जोशी
प्रकल्प कार्यकारिणी सदस्य,
किशोरी विकास, शिक्षा विकास

CSR SPEAKS

As I reflect on our partnership, I'm filled with gratitude for the remarkable work you continue to do and the privilege of walking alongside you on this journey.

What truly sets Seva Sahayog apart is your unwavering commitment to intentional, sustained change. Your focus on school infrastructure, digital enablement, robotics labs, and mentorship isn't just building classrooms; it's building futures. And your openness to bring our employees into this work through the volunteer calendar you've curated has enriched our organization too.

As we step into the International Year of Volunteers, I'm excited about deepening this partnership further. Your vision and our resources, combined with the genuine desire of our teams to contribute, can create something truly transformative.

Thank you for being the kind of partner who doesn't just accept support but invites us to be part of the story. That makes all the difference.

- Anagha Mondkar – HRBP (APAC)
Forcepoint

"We are pleased to share our experience of working with Seva Sahayog Foundation over the past few years as part of our CSR initiatives.

Our association with Seva Sahayog Foundation has been a positive and meaningful experience. Over the years, we have collaborated with them primarily for the distribution of school kits to underprivileged children, helping provide them with essential educational materials and supporting their learning journey.

The team at Seva Sahayog Foundation has consistently demonstrated professionalism, commitment, transparency and dedication in the implementation of the projects. Their personnel have been cooperative, responsive and well-coordinated throughout the engagement, ensuring that the projects are executed smoothly and as planned.

We appreciate their efforts in reaching out to children from underserved communities and creating a meaningful impact through their initiatives. Our experience with the Foundation has been very positive, and we value the relationship we have built with their team over the years.

We look forward to continuing our association with Seva Sahayog Foundation and supporting initiatives that contribute towards creating better opportunities for children and communities in need."

- Shantha POOJARY
Procurement Head &
CSR Lead for South Asia Area
BUREAU VERITAS

Since 2018, our organization has partnered with Seva Sahayog Foundation SSF to drive impactful Corporate Social Responsibility (CSR) initiatives across rural Maharashtra. Over the past eight years, this collaboration has significantly improved educational infrastructure and student well-being. Our overall experience with SSF has been exceptional.

Together, we have successfully implemented a diverse range of impactful interventions

SSF stands out as an exemplary implementation partner due to their operational excellence:

Meticulous Planning: Every project is backed by thorough preparation and clear timelines.

Robust Governance: Continuous follow-ups and unannounced surprise visits ensure high quality and accountability on the ground.

Domain Expertise: The team demonstrates deep subject-matter knowledge across diverse fields, from solar tech to sanitation.

Hands-on Approach: We highly appreciate their deeply involved leadership style, evidenced by their active, physical participation even in granular tasks like the school kits assembly procedure.

SSF has proven to be a highly reliable, transparent, and expert NGO partner. Their structured approach combined with a genuine ground-level commitment has made our CSR journey in Maharashtra both seamless and deeply impactful. We look forward to continuing this fruitful association in the coming years.

- Sachin Anerao,
Company Secretary
SI Group - India Private Limited

प्रवास निरंतर सेवेचा...

गेल्या १७ वर्षांच्या या अविस्मरणीय सेवायज्ञाच्या प्रवासात ज्या ज्या हातांनी आणि हृदयांनी आपले योगदान दिले आहे, त्या प्रत्येकाप्रति आम्ही आदर आणि कृतज्ञता व्यक्त करतो. आम्ही सदैव ऋणी राहू

आमचे संस्थापक

ज्यांनी ही सेवाज्योत पेटवली आणि आम्हाला निरपेक्ष सेवेचा आणि त्यातून मिळणाऱ्या अलौकिक आनंदाचा अनुभव घेण्याची मोलाची संधी दिली.

आमचे CSR भागीदार व वैयक्तिक देणगीदार

ज्यांच्या विश्वासाने आणि खंबीर पाठिंब्याने आमच्या ध्येयाला रोज नवे बळ दिले.

आमचे सामाजिक व समुदाय भागीदार तसेच असंख्य लाभार्थी

ज्यांनी आपल्या स्नेहाचे दरवाजे उघडून आम्हाला खऱ्या अर्थाने सकारात्मक बदल घडवण्याची संधी दिली.

आमचे अगणित स्वयंसेवक व सहकारी

ज्यांची अथांग ऊर्जा आणि निष्ठा हाच या सेवायज्ञाचा खरा श्वास आहे.

आमचे निष्ठावंत कार्यकर्ते व कर्मचारी

जे आपल्या अहोरात्र कष्टांनी प्रत्येक स्वप्नाचे सत्यात रूपांतर करतात.

आणि अशा प्रत्येकाचे

ज्यांनी या पवित्र कार्यात आपल्या आत्म्याचा एक अंश अर्पण केला आहे.

HEXAWARE · SI Group · ICICI Lombard

ADITYA BIRLA CAPITAL FOUNDATION · IKS HEALTH · worley

INDIRA IVF FERTILITY & IVF CENTRE · MAHANAGAR GAS · BURNS McDONNELL

BEW · ROTARY CLUB OF MUMBAI GHATKOPAR WEST · NPCI ALWAYS FORWARD

CareEdge · ALTRES Technologies · NIWAS HOUSING FINANCE

INNOVENT · टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड · Keva

FINACUS Powered By Innovation · THALES Building a future we can all trust · Indoco


DAM CAPITAL · FIS · Linedata

BUREAU VERITAS · GLORY · ADF FOODS LTD.

tenova · mahindra Rise · IndianOil Adani Ventures

आणि अजून...

हा प्रवास समृद्ध केल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनापासून आभार!



SEVA SAHAYOG
Celebrating Humanity

Mumbai
2nd Floor, Soman Bldg,
Behind Hotel Classic,
Old Nagardas Road,
Andheri East,
Mumbai - 400069

Thane
Babu Genu Bhavan,
Kadam Compound,
Khartan Road,
Near Fire Brigade station,
Thane West - 400601

Pune
18 "Pathik" Vrundavan Society,
Nr Shri Shri Ravi Shankar Vidya Mandir,
Navi Peth, Mhatre Bridge,
Pune - 411030.

www.sevasahayog.org
mumbai@sevasahayog.com

(Registration No. U85100PN2009NPL168137)